# श्री साईलीला

ा अंकांत —


- श्रीसाईबाबांचा गुरुमंत्र
- जगन्माता शारदापणी देवी
- जाणोनि नेणतें करीं माझें मन
- समर्पण हाच शाश्वत सुखाचा मार्ग
- पांडवांचें परलोक गमन
- प्रतिमा पूजनाचें महात्म्य
- श्रीसाईबाबांचें विश्वधर्माचें कार्य
- श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद
- आपल्या आकांक्षा आटोक्यांत ठेवा
- साधकासाठीं मार्गदर्शन
- अल्ला मालिक अखंड वदनीं
- मुमुक्षु होण्याचा मार्ग
- बाबांची लीला
- संत बाबा महाराज यांचें चरित्र
- संत तिरुवल्लुवर यांचीं बोधवचनें
- माझी श्रद्धा
- संत नामदेवाची अमृतवाणी


जानेवारी १९६१



# श्री साई वाक्सुधा

“श्रीमंती म्हणजे केवळ दुपारची छाया. ती कायम टिकणारी असते का ? तेव्हां श्रीमंतीच्या मदानें कोणाचा अपमान करूं नये; कोणाचा छळही करूं नये. आपल्या प्राप्तीप्रमाणें अडल्या नडलेल्यांस जरूर मदत करावी. यथाशक्ति दानधर्म करावा. श्रीमंतीला शोभा येते ती त्यामुळें. अंथरूण पाहून पाय पसरावे. कर्ज काढून श्रीमंतीचा डौल आणूं नये. तसेंच उधळपट्टी कटाक्षानें टाळावी. प्रपंच किंवा हा संसार अशाश्वत आहे हें तर खरेंच; परंतु प्रारब्धानुसार तो आपल्या वाट्यास आलेला असतो. त्याचा कंटाळा करून चालणार नाहीं. प्रपंच चालविण्यासाठीं द्रव्याची जरूर असते. प्रपंचांत पैसा ही जरूरीची बाब असली तरी त्यांतच सारें लक्ष गुंतवून ठेऊँ नये. जरूर तेवढा पैसा अवश्य मिळवावा. कृपणपणानें वागूं नये. उदारपणानें वागावें. त्याचबरोबर औदार्य प्रगट करावयाचें तें शक्तिप्रमाणें. नाहीं-पेक्षां मागाहून आपणास कोणीही विचारीत नाहीं.”

— श्रीसाईसच्चरित

---

# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३९ वें ] जानेवारी १९६१ [ अंक १० वा

: संपादक :

गो. वि. क्षीरसागर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. २५१२७४

: कार्यालय :

‘साई निकेतन,’ व्हिन्सेंट रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं ८०४ बी,
दादर, मुंबई १४

# प्रिय वाचक—

श्रीसाईबाबा शिरडी संस्थानतर्फे चालू असलेल्या ' श्री साईलीला ' या मासिकाचे सन्माननीय संपादक श्री. नागेश आत्माराम सावंत यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला असून या अंकापासून त्याजागी कोर्ट रिसीव्हर श्री. गो. वि. क्षीरसागर यांची योजना झालेली आहे. श्री. नागेशराव सावंत यांनीं हें मासिक आपल्या सहकारी मंडळींच्या सहकार्यानें गेलीं आठ वर्षे उत्तम प्रकारें चालविलें याबद्दल त्यांना द्यावें तेवढे धन्यवाद थोडेंच होतील. त्यांच्या अष्टवार्षिक कारकिर्दींत ' श्रीसाईलीला ' त्रैमासिकाचें मासिकांत रूपांतर होऊन उत्तरोत्तर त्याला उन्नत स्वरूप येत गेलें. त्यांना सहकार्य लाभलें तशाच प्रकारचें सहकार्य या मासिकाच्या व इतर बाबतींतही श्रीसाई-बाबांच्या कृपेनें यापुढेंही उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणांत मिळत जाईल अशी आशा आहे.

× × ×

## साई निकेतन गृहप्रवेश

श्री साईबाबा शिरडी संस्थानतर्फे मुंबईत दादर, व्हिन्सेंट रोडवर खोदादाद सर्कल जवळ खरेदी करण्यांत आलेल्या इमारतीस ' साई निकेतन ' हें नाव देण्यांत येऊन त्यावर एक नवीन मजला बांधण्यांत आला. या साई निकेतनचा गृहप्रवेश विधीपूर्वक गुरुवार ता. १५ डिसेंबर १९६० रोजीं पार पडला. त्यादिवशीं सकाळीं वास्तुशांति पूजा विधि कोर्ट रिसीव्हर श्री. गो. वि. क्षीरसागर यांच्या हस्तें यथाविधी पार पडला.

ता. २० डिसेंबर १९६० पासून शिरडी संस्थान मुंबई कचेरीचें स्थलांतर त्याठिकाणीं झालें असून यापुढें सर्व प्रकारचा पत्रव्यवहार, मनिऑर्डरी पाठविणें किंवा भेटणें सवरणें वगैरे व्यवहार पुढील पत्त्यावर करण्यांत यावा.

**साईनिकेतन ' व्हिन्सेंट रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.**

---

रागीट, स्वार्थी, बढाईखोर, अहंकारी, खोटें बोलणारा व दुराचारी अशा माणसाच्या सहवासांत क्षणभरही येऊं नका. त्यांच्यांतील एखाद्या दुर्गुणाच्या तावडींत सांपडण्याचें फार भय असतें; म्हणून त्यांचा सहवास प्रयत्नेंकरून टाळा. —सेनेका

× × ×

' ईश्वर जरी सर्वत्र आहे, सर्वव्यापी व सर्वसाक्षी आहे तरी त्याचें ज्ञान आम्हांस मानवी आकृतीच्या द्वारेंच व्हावयाचें आहे व आमचे सद्गुरुनाथ श्रीरामकृष्ण यांच्या-इतकी पवित्र, पूज्य पण पूर्णमूर्ति दुसरी नसल्यामुळें आम्हीं त्यांनाच शरण आहों.'

—विवेकानंद

# जगन्माता शारदामणी देवी

**श्री शारदामणी देवी म्हणजे श्री रामकृष्ण परमहंस यांच्या धर्मपत्नी. त्यांची पूर्वपुण्याई फार थोर होती; आणि म्हणून तर त्या श्रीरामकृष्णासारख्या संताच्या सहवासांत येऊन जगन्मातेच्या थोर पदाला जाऊन पोहोंचल्या. त्यांचें सारें जीवन उज्वल आहे.**

जेव्हां धर्मग्लानी होते, अनाचार सर्वत्र आपला पगडा बसवितो, न्यायनीतीची बंधनें शिथील होऊं लागतात; तेव्हां ती आपत्ति टाळण्यासाठीं व जनतेला सन्मार्ग दाखविण्यासाठीं भगवंताला अवतार घ्यावा लागतो. आपला दैवी हेतू साध्य करण्यासाठीं भगवंताला सुयोग्य, पुण्यवान् अशा माणसाची योजना करावयाची असते. कुलशील-संपन्न असें घराणें टेहळून त्या घरीं भगवंताचा अवतार होत असतो. जेथें देव भक्ति नांदते, जेथें त्याचें नामस्मरण सतत चाललें आहे व जेथें रोजच्या रोज पुण्याच्या राशी जमा होत आहेत असेंच पवित्र स्थान देव निवडतो. हेंच पहा ना. जेव्हां रावणानें सर्वांना 'त्राहि भगवान' करून सोडलें तेव्हां श्रीरामचंद्राचा अवतार झाला व त्यांना त्यांच्या कार्यांत सहभागी व पूरक होण्यासाठीं जनकाच्या घरीं सीतादेवी अवतीर्ण झाल्या.

तोच प्रकार श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या बाबतींत घडला. त्यांनाहि सुयोग्य सह धर्मचारीणीची जोड व्हायला हवी होती. जगन्माता त्यासाठींच श्री शारदामणी देवी या नांवानें जन्माला आली. श्रीरामकृष्णास त्यांच्या साधनेंत तिची फार जरूरी होती. एवढेंच नव्हे तर त्यांच्यामागें साधनेचा तो नंदादीप सतत तेवत रहाणें जरूर होतें.

## घराण्याचा अल्प परिचय

पश्चिम बंगालमध्यें बांकुरा जिल्ह्यांतील जयरामवती नामक खेडयांत मुझूमदार या नांवानें ओळखलें जाणारें एक कुटुंब होतें. त्यांच्या घरीं दारिद्र्य परिपूर्ण होतें. दारिद्र्य आणि श्रीमंती यांपैकीं तुम्हीं काय पत्कराल ? श्रीमंतीच ना ? परंतु मनुष्याची खरी कसोटी लागत असते दारिद्र्यांतच. त्या स्थितींत नाना प्रसंग उद्भवतात. त्यांना धैर्यानें व नीतीनें तोंड देऊन कसोटीला उतरावें लागतें. मुझुमदार कुटुंब त्या कसोटीला पूर्णपणें उतरलें होतें. देवदेवतांचें लक्ष अशाच घराण्याकडे असतें. घरची गृहिणी शामसुंदरी व तिचे पतिराज रामचंद्र हीं दोघेंही परम देवभक्त होतीं. पदोपदी तीं कसोटीस लागत होतीं व हरेक कसोटींत तीं यशस्वी होत होतीं. अशा घ
लक्ष नाहीं जावयाचें तर आणखी कुठें जाणार ?

श्री. शारदादेवीचें एक सांगोपांग व सुंदर च
त्यांत चरित्रकार सांगतात कीं, 'एकदां श्यामसुंदरी ही

असतां रात्रींच्या काळोखांत एका बेलाच्या झाडाखालीं बसली होती. जवळच लोहाराची भट्टी पेटत होती. त्या भट्टीच्या बाजूनें घणघण असा आवाज एकाएकीं आला व झाडावरून हळू हळू एक लहान मुलगी खालीं आली. तिनें आपल्या चिमुकल्या हातांनीं श्यामसुंदरीला मिठी मारिली. त्याबरोबर श्यामसुंदरी बेभान होऊन तेथेंच त्या झाडाखालीं पडली. तिला क्षणिक मूर्च्छा आली. नंतर ती शुद्धीवर आली तेव्हां ती मुलगी आपल्या कुशींत शिरल्याचा तिला भास झाला.'

'त्याच प्रमाणें एके दिवशीं रात्रींच्या प्रहरीं जिचा रंग केतकीप्रमाणें होता अशा एका मुलीनें आपण झोपेंत असतां आपणास मिठी मारली असें रामचंद्रास एक स्वप्न पडलें. तिचें सौंदर्य अप्रतिम होतें व तिच्या अंगावरील अलंकार बहुमोल होते. त्यावरून ती एक अनन्य साधारण कोटींतील कन्यका होती. रामचंद्रानें आश्चर्यचकित मुद्रेनें तिला विचारलें कीं, 'बाळे तूं कोण आहेस ?'

त्या मुलीनें अत्यंत मधूर व हलक्या आवाजांत उत्तर दिलें कीं, मी कोणी असेना का ! मी इथें तुमच्या घरीं रहायला आलें आहे !

त्यापूर्वीच श्रीरामकृष्णांचा (परमहंस) जन्म झालेला होता. त्यांच्या आई बडिलासही असेच अनुभव आले होते असें सांगतात.

ता. २२ डिसेंबर १८५३ रोजीं रामचंद्राचें घर शंखनादानें दुमदुमून गेलें. त्यादिवशीं श्री. शारदामणी देवीचा जन्म झाला.

त्या पवित्र कुळांत शारदामणी लहानाची मोठी होऊं लागली. तिचें देव भक्तीकडे व देव पूजनाकडे सतत लक्ष लागून राहिलेलें असे. ती अत्यंत शांत स्वभावाची होती. बालपणापासून जशी भक्तीची आवड होती, त्याचप्रमाणें तिचें खाणेंसवरणें, कपडेलत्ते सारें कांहीं साधें व स्वच्छ असे. तिला डामडौल आवडत नसे. आतांच सांगितल्याप्रमाणें देवभक्ती हा तिच्या ठायीं उपजत गुण होता. तासचे तास ती ध्यानमग्न स्थितींत बसलेली दिसावयाची.

## रामकृष्णांचा विवाह

तिकडे रामकृष्ण परमहंस हे देवभक्तीनें भारले गेले होते. ते नाना प्रकारचे चाळे त्या अवस्थेंत करीत असत. आजूबाजूच्या लोकांस तें सर्व विचित्र वाटावयाचें. यांची सुधारणा कशी होणार ? हें वेड कसें जाणार ? या चिंतेंत ते होते. कोणी म्हणाले, यांचे दोन हातांचे चार हात करून टाका. म्हणजे यांची सुधारणा होईल. मग येतील आपोआप ठिकाणावर. माणसांचे मागे बंधन पाहिजे. जबाबदारी पाहिजे. बायको घरांत आली म्हणजे आपोआप डोळे उघडतील !

लग्न करून टाकावें असें ठरलें, परंतु सुयोग्य मुलगी मिळाली पाहिजे. तिचा शोध चालू होता. ती गोष्ट रामकृष्णांच्या कानापर्यंत पोहोंचली तेव्हां ते म्हणाले, "अरे ! त्यांत शोध कसला करतां आणि चिंता कसली करतां ? जयरामवटी गांवीं रामचंद्र मुकर्जी नांवाचे गृहस्थ रहातात. त्यांची मुलगी ठरवून टाका म्हणजे झालें !"

इतके सांगितल्यानंतर वेळ कोण लावील? रामकृष्णांचें वय त्यावेळीं तेवीस होतें. आणि शारदामणीचें होतें अवघें पांच! त्याकाळीं तें ठीकच होतें! दोघेंहीं विवाहबद्ध झालीं.

त्या पांच वर्षांच्या मुलीला कसली समजूत असणार? नाहीं म्हणायला तिला देव-बाप्पाची मात्र फार आवड होती. आणि रामकृष्ण प्रत्येक स्त्रीकडे मातृभावनेनें पाहून तोच बाणा अंगी बाणविण्याच्या उद्योगांत होते. स्त्री म्हणजे माता—जगन्माता ही त्यांची भावना दृढमूल होऊं लागली होती. तशा प्रकारची शिकवणूक ते आपल्या मनाला देऊं लागले होते.

सौ. शारदामणी वयांत आली व पतीराजाबरोबर संसार थाटायला त्यांच्या घरीं कलकत्त्यास आली.

## पहिला प्रश्न

परस्परांचा परिचय झाला व तो वाढत चालला. एक रात्रींचा प्रसंग. तोच पहिला वहिला. दोघेही एका बिछान्यावर पहुडलीं होतीं. रामकृष्णास पत्नीची परिक्षा घ्यायची होती. तिला कसोटीला लावून हें खरें सुवर्ण आहे कीं बनावट सोनें आहे, हें त्यांना पहावयाचें होतें. त्यानीं पहिला प्रश्न विचारला तो कोणता?

“काय ग? जगांतील सर्वसाधारण माणसें स्त्री पुरुष या नात्यानें एकमेकांशीं वागतात तशीच तूंही माझ्याबरोबर वागून मला त्यांच्या बरोबरीला आणून ठेवणार आहेस का?’

शारदामणी हा प्रश्न ऐकून मुळींच चपापली नाहीं. ‘बहुत सुकृताची जोडी तिच्या गांठीशीं होती; मग ती चपापेल कशाला?

ती म्हणाली, ‘पतिदेवा! नाहीं बरं; तसं कांहींच मनांत आणूं नका. जगांतील इतर माणसांच्या बरोबरीला मी आपणास कशी बरं आणून सोडीन? मी आपणास खालीं खेचण्यासाठीं येथें नाहीं आलें. आपण वर वर जात आहांत; त्यांत आपली सहधर्मचारिणी या नात्यानें अधिकाधिक वर जाण्यासाठीं आपणास शक्य तो सहकार द्यावा, या हेतूनें मी येथें आलें आहें बरं का?’

किती नाजूक तसाच गंभीर प्रसंग होता तो! शारदामणीनें अनन्यसाधारण रीतीनें परंतु सहज रीतीनें तो कसा सोडविला!

आणि अशा वेळीं प्रभू श्रीरामचंद्राच्या विवाहाची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. जनकराजानें आपली कन्या सीता देवी हिला श्रीरामचंद्राच्या हातीं सोपवितांना म्हटलें होतें कीं, ‘इयं सीता मम सुतासहधर्मचरी तव,’ आणि अखेरपर्यंत तिनें तें सहधर्म-चारिणीचें महत्वाचें पद किती चतुराईनें व सुंदर रीतीनें शोभविलें! श्रीराम अरण्यवासांत जाण्यासाठीं बाहेर पडले. अरण्यवासांतील दुःखें काय सांगावीं? पतीराजानें परोपरीनें समजाविलें तरी त्यांच्याबरोबर जाण्याचा निर्धार तिनें बदलला नाहीं. कितीही संकटें कोसळोत. जगांतील सारीं दुःखें मला भोगावीं लागोत. परंतु कोणत्याहि परिस्थितींत मी तुमची सोबत सोडणार नाहीं. जेथें तुम्हीं तेथें मी.

५.

" न ते दुःखं करिष्यामि निवसन्ती सह त्वया " माझा तो धर्म आहे.

## एकमेकांस सहकार

अशा रीतीनें रामकृष्ण व शारदामणी हीं एकत्र राहून एकमेकांस अध्यात्मिक मार्गांत संपूर्ण सहकार देऊं लागलीं. एकमेकांच्या परमोन्नतीसाठीं झटूं लागलीं. आणि त्यासाठींच तर तीं एकत्र आलीं होतीं. दोघांचाही मार्ग एकच होता. त्या मार्गानें हातांत हात घालून जाण्यासाठीं दोघेही बद्धपरिकर झालीं होतीं. एका झाडावरील हे दोन पक्षी होते. एक वरच्या डहाळीवर तर दुसरा खालच्या डहाळीवर बसला होता. दोघेही एकमेकांस शक्य त्या परीनें सहकार देत होते. पतीएवढी तयारी झालेली नसली तरी अनन्य भावेन एकदां तोच मार्ग स्वीकारल्यावर व रामकृष्णसारख्या मार्ग दर्शकाची जोड लाभल्यावर तत्सम व्हायला कितीसा वेळ लागणार ?

श्री रामकृष्ण शारदामणीकडे मातेच्या दृष्टीनें पहात होते. ती दृष्टी कसली ? ती त्या भगवंतांची कृपा दृष्टि होती. त्या कृपेच्या छाया छत्राखालीं ती येत होती. मातेचेंच नव्हे तर जगन्मातेचे स्वरूप तिला येऊं लागलें होतें.

एके दिवशीं रात्रीं शारदामणी आपल्या पतीचे पाय चुरीत होती. हळुहळु तेल लावीत होती. मध्येंच तिनें विचारलें, " मला आपण कोण समजतां ? "

" मी तुला कोण समजतों हें सांगूं का ? त्या मंदिरांत कालीमाता बसली आहे ना ? तिनेंच मला जन्म दिला, आणि या वेळीं तीच माझी माता माझ्या पायांना तेल चोळीत आहे. तीच तूं आहेस. "

## दिव्य दांपत्य

असें होतें हें दिव्य दांपत्य ! एके दिवशीं भगवान रामकृष्णांनीं कालीमातेसाठीं तयार केलेल्या शोभिवंत उच्चासनावर शारदामणीला बसविलें व त्या मातेची पूजा करावी तशीच तिचीही शोडषोपचारें भक्तिभावपूर्वक पूजाअर्चा केली. अशी त्यांची दृष्टी झालेली होती.

आणि तशा त्या अवस्थेंत शारदामणीची समाधी लागली. श्रीरामकृष्ण हे तर तिला जगन्माता समजून तद्रूप झालेले होते. त्यांचीही त्याचक्षणीं समाधी लागली. दोघेहि क्षणार्धांत सच्चिदानंद स्वरूपीं विलीन झालीं. काय तो आनंद आणि काय तो त्यांचा सोहळा ! कोणाच्या आयुष्यांत अशा प्रकारचा सुखसोहळा आलेला आपण ऐकिला आहे !

' ऐसें भाग्य कधीं लाहता होईन ।
अवघें देखें जन ब्रह्मरूप '

परंतु तत्पूर्वी स्वतः ब्रह्मरूप व्हावें लागतें. ती अवस्था या दोघांच्याहि वाट्यास आलेली होती. ती येण्यासाठीं मनाची केवढी तयारी व्हावी लागते. किती त्रासांतून जावें लागतें. ' चणे खावे लोखंडाचे । तेव्हां ब्रह्मपदीं नाचे ' असें म्हटलें आहे तें उगाच नाहीं.

पतीनें पत्नीची केवढी ही तयारी केली! अलिकडच्या काळांत असें एकहि उदाहरण सांपडणार नाहीं.

'या देवी सर्व भूतेषु मातृरूपेण संस्थिता।
नमस्तस्यै, नमस्तस्यै, नमस्तयै नमो नमः।

हा श्लोक म्हणणें सोपें आहे नाहीं का? परंतु तो स्वतःच्या आचरणांत आणणें महाकठीण आहे. भगवान रामकृष्णांनीं तो आपल्या आचरणांत आणून दाखविला.

## लोकविलक्षण घटना

किती अद्वितीय व लोकविलक्षण घटना आहे ही! आपल्या पत्नीला एवढें मोठें उच्च स्थान दिलेलें, तिनें तें स्वीकारलेलें व त्या पदाला तिनें पोहोंचावें म्हणून अविरत उद्योग केलेला कोणी एखादा पतिराज आपल्या ऐकिवांत आहे का? काय त्यांचीं मनें होतीं! केवढीं त्यांच्या मनाची तयारी झालेली होती! आपण या घटनेची कल्पनाहि करूं शकणार नाहीं! अतर्क्य! असामान्य व दैवी अशी ही घटना आहे.

आणि ही अवस्था यदृच्छेनें प्राप्त झाल्यानंतरही शारदामणी आपल्या पतीची सेवा पत्नी या नात्यानें मनोभावें करीत होतीं. त्या कर्तव्यांत तिनें केव्हांहि यत्किंचित कसूर केली नाहीं. प्रत्येक बारीक सारीक गोष्टींत ती लक्ष घालीत असे, त्यांच्या घरी रोज नाना प्रकारचीं असंख्य माणसें येत असत. त्यांची प्रेमळ मातेप्रमाणें सर्व प्रकारची व्यवस्था तीच दक्षतेनें ठेवीत असे.

तिच्या आयुष्यांत एक दिवस दुःखाचा उजाडला. श्री रामकृष्णांनी समाधि घेतली तोच तो दिवस. दुःख वाटलें परंतु तें क्षणिक होतें. विचारानें तिनें तें आवरलें व ती आपल्या उद्योगास लागली. श्री रामकृष्णांचे हजारो शिष्य होते. त्यांचें सांत्वन व मार्गदर्शन तिला करावयाचें होतें. पतिराजांची गादी तिला चालवावयाची होती. ती जबाबदारी आतां तिच्यावर पडलेली होती व ती तिनें कर्तव्यबुद्धीनें स्वीकारली होती.

श्री शारदामणीचें मन दुःखीकष्टी झालेलें समजून येतांच ते तिच्या स्वप्नांत आले आणि तिचें योग्य शब्दांत सांत्वन करून ते म्हणाले, "मी तुला सोडून कुठें दूर नाहीं गेलों. सतत तुझ्याजवळ आहें. एका खोलींतून दुसऱ्या खोलींत गेलों, एवढेंच काय तें. तूं दुःखी कष्टी मुळींच होऊं नकोस."

त्या शब्दांनीं शारदामणीदेवीचें समाधान झालें; आणि ती आपल्या पतीराजांची गादी पुढें चालवूं लागली. ती सर्व शिष्यांची प्रेरणादाती होऊन राहिली होती. श्रीरामकृष्णांचा तिच्यावर पूर्ण वरदहस्त होता. त्यांचें सारें सामर्थ्य तिला प्राप्त झालें होतें. जे जे तिच्याकडे येत ते ते आनंदाचें व स्फूर्तीचें गाठोडें बरोबर घेऊन जात असत. स्वामी विवेकानंद तर तिला मातेप्रमाणें मान देत असत. तिच्या अनुज्ञेशिवाय पुढें पाऊल टाकीत नसत. स्वामीजींच्या मनांत अमेरिकेस जाण्याचें आलें तेव्हां त्यांनीं तिचे आशीर्वाद घेतले. त्यांच्याठायीं जें दैवी सामर्थ्य निर्माण झालें तें या आदिशक्तीमुळेंच होय. त्यांना या गोष्टीची पूर्ण जाणीव होती. अशा थोर होत्या श्री. शारदामणीदेवी. त्या ता. २१ जुलै १९२० रोजीं समाधिस्थ झाल्या.

---

# ' जाणोनि नेणतें करीं माझें मन '

***********************************

—श्रीसंत तुकोबा

**जाणोनि नेणतें करीं माझें मन । तुझी प्रेमखूण देऊनियां**
**मग मी व्यवहारीं असेन वर्तत । जेवी जळा आंत पद्मपत्र**
**ऐकूनि नायकें निंदास्तुति कानीं । जैसा का उन्मनीं योगीराज**
**तुका म्हणे ऐसें झालिया वांचून । करणें तें तें सीण वाटे ॥**

श्रीसंत तुकोबा यांचा हा अभंग दिसायला अत्यंत साधा परंतु तितकाच सुंदर आहे. त्या अभंगांत किती तरी खोल अर्थ भरलेला आहे. तो शांतपणें व विचारपूर्वक उलगडून पहाण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. भक्ताच्या जीवनाचें रहस्य काय, मनुष्य पुरुषार्थी व सर्वपरीनें वंदनीय कसा होऊं शकतो याचें रहस्य अगदीं मोजक्या शब्दांत तुकोबारायांनीं या अभंगांत सांगितलें आहे.

त्यांना देवभक्तीची आवड होती हें तर उघडच आहे. मन निर्मळ व पवित्र बनल्या शिवाय खरी खुरी मानवसेवा हातून घडत नाहीं. त्यासाठी देवाबद्दल अंतःकरणांत प्रेम असावें लागतें. देवा, तुझ्याबद्दल मला अंतःकरणांत प्रेमभाव उत्पन्न झाला म्हणजे कोणाचा हेवादावा करावा, कोणाच्याही स्तुतीनें हुरळून जावें किंवा निंदेनें दुःखीकष्टी व्हावें असें माझ्याकडून घडणार नाहीं. या गोष्टींची जाणीव असून तो नसल्यासारखी होऊं दे. कोणी कांहीं म्हणो, स्तुति करो वा निंदा करो, मी तें मनावर मुळींच घेणार नाहीं; मी निर्लेप राहीन असें कर. निर्लेप कसा ? कमळ पुष्पासारखा. कमळ पाण्यांत वाढतें. त्याच्या सभोंवार चिखलही असतो. परंतु त्यांपैकीं कशाचाहि त्याला स्पर्श होत नाहीं. जो योगी असतो, त्याला कोणाच्या निंदास्तुतीची पर्वा वाटत नाहीं. तो आपल्या मार्गानें जात असतो.

## कमलपुष्पाची सार्थ उपमा

या जगांत वावरत असतां नानाप्रकारचीं बोलणीं आपणास ऐकून घ्यावीं लागतात. नाना आघात, प्रत्याघात सहन करावे लागतात. मन त्यामुळें इकडेतिकडे हेलकावे खाऊं लागतें. त्यांत अंतराय निर्माण होतो. यासाठीं त्या गोष्टींना महत्वच द्यायचें नाहीं. जें घडलें असेल तें तात्काळ विसरून जावयाचें. मनाला त्याचा संपर्क लागू द्यावयाचा नाहीं. पाण्यांत व चिखलांत वाढलेलें कमल पुष्प, परंतु त्याला जरा तरी डाग लागलेला असतो का ? त्याच्याकडे पाहिलें असतां मन किती प्रसन्न व प्रफुल्लित होत असतें नाहीं का ? कमळ म्हणजे पावित्र्याची खूण. कमळाची उत्पत्ति तळ्यांत होत असली तरी त्याची दृष्टि असते आकाशाकडे. कमळ म्हणजे पावित्र्याचें व शुद्ध प्रेमाचें प्रतिक. चिखलांत जन्म

घेऊनहि त्याला त्या चिखलाची बाधा होऊं शकत नाहीं. कमळाचा शांतपणा व सुंदरपणा डोळ्यांत भरण्यासारखा असतो. त्याप्रमाणें आपलें जीवन बनलें पाहिजे. त्याप्रमाणें दैनंदिन व्यवहारांत आपल्याकडून वर्तन घडलें पाहिजे.

आपल्या व संतांच्या किंवा योग्यांच्या वागण्यांत हेंच तर महदंतर असतें. संतांची तुम्हीं कितीहि निंदा करा किंवा स्तुति करा. त्यांच्या मनावर त्याचा कांहीं एक परिणाम घडत नाहीं. योग्याचेंही तसेंच. कोणत्याहि परिस्थितींत आपल्या मनाची शांति ढळतां कामा नये.

**नेणतेपण तें हेंच**

आपलें अहित करणारे किंवा चिंतिणारे पुष्कळ लोक असतात. निंदा करणारेहि असतील. जगांत अशीं माणसें असावयाचीं; परंतु त्या गोष्टीचें मनन करूं नका; त्यांची आठवणहि ठेऊं नका. आपलें अहित किंवा वाईट करणारे असतील त्यांना क्षमा करा. त्यांचें भलें व्हावें यासाठीं हातून होईल तें करा. ज्यानें जाच केला असेल, उपद्रव दिला असेल त्याला क्षमा करावयाची व त्याच्यावर सर्व विसरून प्रेम करावयाचें, त्याचा उत्कर्ष चिंतावयाचा, यालाच म्हणतात नेणतेपण. हें नेणतेपण अंगीं बाणवण्यासाठीं आपण झटलें पाहिजे. संत तुकोबा हेंच कळवळ्यानें सांगत आहेत. ज्याच्या अंगीं हा नेणतेपणा आला ते संतपदाला पोहोंचले.

आपण कधींहि कोणाच्या दोषाकडे पाहूं नये किंवा त्याचें चर्वितचर्वण करूं नये. दोषाची दृष्टी आड करून गुणांचें कौतुक करावें. अपकार विसरावे व उपकार आठवावे. तुम्ही असे वागत गेलांत; अशा रीतीनें तुम्हीं वागूं लागलां म्हणजे तुमचें अंत:करण आस्ते आस्ते शुद्ध होत जाईल त्याला कमळ पुष्पाचें पावित्र्य व सौंदर्य येत जाईल आणि अशा त्या अंत:करणांत तुम्हांला भगवंत बसलेला दिसूं लागेल.

---


**लहान मुलाच्या आंकडीवर**

**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

**कांचनलाल वाडीलाल कं.** — दवाबझार, मुंबई २.

# समर्पण हाच शाश्वत सुखाचा मार्ग

********************************************

—जगद्गुरु श्रीशंकराचार्य, कांची

जो कोणी आपलें निहीत कर्तव्यकर्म इमानेइतबारें व मनोभावें पार पाडीत असतो व मनांत कोणताहि विकल्प किंवा शंका न बाळगतां प्रत्येक गोष्ट, प्रत्येक कार्य ईश्वरार्पण करीत असतो व समर्पण बुद्धीनें वागत असतो त्यालाच शाश्वत सुखासमाधानाचा लाभ होत असतो.

## मनाचा समतोलपणा

सारें कांहीं आपल्या मनावर अवलंबून आहे. मनाची तशी तयारी करावी लागते. तेवढी मनाची प्रगती व्हावी लागते. तो दृष्टीकोन मनाला यावा लागतो. मग लहानमोठीं वाटेल तेवढीं व वाटेल त्या प्रकारचीं संकटें येवोत तीं तो मनुष्य सहज रीतीनें सहन करूं शकतो. त्याला त्याचें कांहीं वाटत नाहीं. दुसरे जे कोणी संकटांत सांपडले असतील त्यांचेंही तो समाधान करूं शकतो. कारण त्याच्या मनाचा समतोल त्यानें साधलेला असतो. मनाचा समतोलपणा राखणें, कोणत्याहि परिस्थितींत त्याला धक्के बसूं न देणें ही एक मोठ्यांतली मोठी कला आहे. ती ज्यानें साध्य केली त्याला कोणतीही गोष्ट अशक्य नाहीं. जगांत आपल्या सभोंवार सर्वत्र अशीच माणसें आढळून येतात कीं, जी लहान सहान प्रसंगानें बावरून जातात, यःकश्चीत अडचणीनेंही गोंधळून जातात. कारण त्यांनीं मनावर ताबा मिळविलेला नसतो. त्यांनीं मनाचा समतोलपणा संभाळण्याची कला हस्तगत केलेली नसते.

या जीवनांत सुखदुःखाचा पाठाशिवणीचा खेळ अखंड चालू असतो. आपल्या पूर्वकर्मानुसार दुःखाचे प्रसंगहि आपल्यावर येत असतात. ते सोसूनच सुटका. त्यावेळीं हताश होऊन किंवा दुःखीकष्टी होऊन काय बरें उपयोग ? या जगांतील सर्व प्रसंगांकडे पहाण्याची विशिष्ट दृष्टि आपण अंगीं बाणवली पाहिजे. सुखाच्यावेळीं उगाच बेहोष होऊन जावयाचें नाहीं किंवा दुःखाच्या वेळीं हताश व्हावयाचें नाहीं; हें व्हायला अंगीं तसें सामर्थ्य यावें लागतें. तें उगाच येत नाहीं. तें प्रयत्नेंकरून कमवावें लागत असतें.

## सुखाचा उगम हृदयांतच आहे

सर्व सुखाचा उगम आपल्या हृदयांतच आहे. सुख कुठें बाहेर नाहीं. सुखाचा कुबेर तुमच्या हृदयांत वास करीत आहे. आपण सुखासाठीं जों पर्यंत बाहेर भटकत राहूं तोंपर्यंत तें कधींहि मिळूं शकणार नाहीं. सुखाची गंगा बाहेर नाहीं. ती तुमच्याच हृदयांत झुळझुळ वहात आहे. त्या पवित्र जलांत बुडी मारून पावन व्हावयाचें आहे. श्रीकृष्णानें अर्जुनाला हाच गुरूमंत्र दिला आहे. ‘ ईश्वर सर्व भूतानाम् हृद्देशेर्जुन तिष्ठति ’ सर्व प्राणिमात्राच्या हृदयीं ईश्वराचें, सुखाच्या सागराचें वास्तव्य आहे. ज्याप्रमाणें एखादें

प्रचंड यंत्र विजेच्या सहाय्यानें चालत असतें त्याचप्रमाणें परमेश्वर निर्मित मायारुपी शक्तीच्या सहाय्यानें या जगाचा कारभार चाललेला आहे.

तेव्हां आम्हीं आमचें कर्तव्यकर्म योग्याप्रकारें व इमानें इतबारें पार पाडावयाचें व मनांत कोणताही विकल्प न ठेवतां सर्व कांहीं भगवंताला समर्पण करावयाचें. आणि हें कसें करावयाचें ? ' **सर्वभावेन.** ' त्यांत बाकी शिल्लक मागेंपुढें कांहीं एक ठेवावयाचें नाहीं. जेव्हां असें घडतें तेव्हां मनाचा समतोलपणा संभाळतां येतो व योग्य प्रकाशांत सर्व प्रसंग दिसूं शकतात.

जेथें भय आहे तेथें शांतता नांदूं शकत नाहीं. आपण प्रत्येक बाबतींत निर्भय रहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. निर्भयता अंगीं बाणविली पाहिजे. ईश्वर आपल्याशिवाय कुठेंतरी वेगळया ठिकाणीं बाहेर आहे; त्याला धुंडाळावयाचा आहे, अशी जोंपर्यंत आपली कल्पना कायम राहील, तोंपर्यंत तुम्हांला शांततेचा लाभ होऊं शकणार नाहीं. ज्याला शांतता हवी असेल त्यानें आपलें अंतःकरण स्वच्छ, निर्लेप व पवित्र ठेविलें पाहिजे. प्रसन्नता फुलूं दिली पाहिजे. असें होईल तेव्हांच आपणाला ईश्वरी प्रसादाची जोड प्राप्त होऊं शकेल. प्रसाद आणि प्रसन्नता हे दोन्हीं शद्ब परस्परावलंबी आहेत. 'प्रसादोस्तु प्रसन्नता.'

आमच्या अंतःकरणांतील सारी अपवित्रता, सारा मळ व सारीं पापें आम्हीं जेव्हां धुवून धुवून साफ करूं, त्याचप्रमाणें आम्हीं जें जें कांहीं करूं त्याचीं बरीं वाईट फळें ईश्वरार्पण करायला शिकूं, तेव्हांच भगवंत आपल्या जवळ येईल. त्याची तुमच्यावर सदैव कृपादृष्टी असते. त्याचे आशीर्वाद तुमच्या पाठीशीं असतात. तोच तुमची भावना लक्षांत घेऊन तुमच्या पदरांत 'परम शांती'चें श्रीफळ योग्य वेळीं टाकीत असतो. आयुष्यांत हा जो क्षण येतो तोच परम व शाश्वत सुखाचा असतो. इतर सर्व सुखें क्षणिक असतात. 'तत् प्रसादत् परं शांतिम् स्थानम् प्राप्यासिशाश्वतम्.'

हें त्रिकालाबाधीत शाश्वत सत्य आहे.

---

ज्यांनीं आत्महिताकडे पाहण्याचें सोडून दिलें आहे त्यांच्याकडे पाहण्याचें देवही सोडून देतो.

× × ×

पापसंस्कार आपल्या सुखस्थितींत सुद्धां आंतून नांग्या मारून सुखाचा विध्वंस करीत असतात, व पुण्य संस्कार आपल्या दुःखस्थितींत सुद्धां दुःख संवेदना दूर करून सुख समाधान देत असतात.

× × ×

प्रेम व पावित्र्य हे आपल्या हृदयांत जसजसे उगवूं लागतील व वाढतील तसतसे ते बाहेर जगांत उगवलेले व वाढलेले आपणांस दिसतील.

× × ×

# पांडवांचें परलोकगमन

**व्यासप्रणीत महाभारतांतील एकेक प्रसंग हृदयाला चटका लावणारा व ज्याच्यापासून कांहीं ना कांहीं बोध घ्यावा असाच आहे. कौरव पांडव युद्धांत पांडवांस विजयश्रीनें माळ घातली, परंतु अखेर धर्मराजास उपरति होऊन त्यानें स्वेच्छेनें इहलोकाचा त्याग केला. बंधूनींहीं त्यांचें अनुकरण केलें तो दारूण प्रसंग।**

धर्माची गति व व्यापकता अत्यंत सूक्ष्म आहे. धर्माचें रहस्य सर्वांनाच समजणें शक्य नाहीं. विषयोपभोग हेंच ज्यांचें लक्षसर्वस्व त्यांना धर्मरहस्य कोठून समजणार? कोणतेंही कार्य असो त्याची शोभा समयानुसार असते. एकच कार्य परंतु त्याचें महत्व वेळेनुसार असतें. एखादी गोष्ट एकदां धर्म तर तीच दुसऱ्यावेळीं अधर्म होऊन रहात असतें. गुरुकुलमध्यें वास करणाऱ्या ब्रह्मचाऱ्याला स्त्रीचें स्मरण, तिचा स्पर्श व तिला पहाणें निषिद्ध समजलें जातें. परंतु आपला अभ्यास संपवून तो ब्रह्मचारी बाहेर पडला व संसार करूं लागला म्हणजे मग सर्व पारडें फिरतें. मग त्याचें स्त्रीशिवाय चालत नाहीं. अग्निहोत्र करायचें किंवा कांहीं करायचें झालें तरी पत्नी जवळ पाहिजे. एकाकाळीं जो अधर्म किंवा जें धर्मबाह्य तोच दुसऱ्यावेळीं धर्म होतो.

## धर्माचरणाचें महत्व

आपण प्रत्येक गोष्ट धर्मासाठीं, देवासाठीं व त्याच्या नावानें करावयाची म्हणजे ती पुण्यदायक होते. आपल्या इंद्रियांचे चोचले पुरविण्यासाठीं जें आपण करतों तें पाप होय. धर्म हें बंधन आहे. धर्म या लोकीं त्याचप्रमाणें परलोकीं सुखसमाधान देणारा आहे. धर्माचरण करीत असतां कधीं कधीं दुःखताप व कष्ट सोसावे लागतात; परंतु धर्माचरणासाठीं कष्ट सोसण्यांत एक प्रकारची मातब्बरी असते. त्यामुळें अखेर समाधानच मिळत असतें. मनाचें समाधान हें सर्वांत श्रेष्ठ आहे. अधर्माचरणानें तुम्हांला कांहीं काळ सुखाची प्राप्ति होईल; परंतु ती टिकणारी नाहीं. मनाला शांति देणारी नसते. त्यामुळें मनाची भगभग, अशांतता वाढत जाते. अधर्मानें द्रव्यार्जन जे जे कोणी करतात त्यांच्या कपाळीं शेवटीं दुःखच भोगायचें असतें. आपण केलेल्या अधर्माचें फळ याच जन्मीं भोगायला मिळतें. सुंदर, मऊ मऊ शय्या आहे; सभोंवार सुगंध पसरलेला आहे; सर्व कांहीं आहे; परंतु अन्यायानें किंवा अधर्मानें जर हीं सुखें संपादन केलेलीं असतील तर त्या माणसाला सुखाची निद्रा येणार नाहीं. या जगांत त्याला सुखसमाधान लाभत नाहीं, तसेंच पुढेंहि त्याच्या नशिबीं दुःखताप हे ठरलेले असतात.

## दुर्योधनाचे हाल

दुर्योधन केवढ्या मोठ्या साम्राज्याचा धनी होता! पांडवांकडून त्यांनीं तें राज्य अन्यायानें, जबरदस्तीनें हिरावून घेतलें होतें; आणि त्यामुळें एवढें राज्य मिळवूनही त्याच्या वाट्याला सुख समाधान आलें होतें कां? मुळींच नाहीं. त्याला सदासर्वकाळ पांडवांचें भय वाटत असे. कधीं सुखाची झोप त्याच्या वाट्याला आली नाहीं. काय ते त्याचे हाल! त्याच्या सभोंवार सुखाचे सर्व प्रकार जय्यत तयार होते. परन्तु त्यापासून त्याला सुखाचा किंवा आनन्दाचा लाभ होत नव्हता. सदा काळजींत व दुःखांत तो कालक्रमणा करीत होता. पांडवांचा नायनाट कशारीतीनें करून टाकावा याच्याच विचारांत व चिंतेंत तो रात्रंदिवस होता. नानाप्रकारचे कट व उपाय योजना करण्यांत त्याचा वेळ जात होता.

आणि त्याचा काय बरें शेवट झाला? एवढा मोठा त्याचा कुटुंबविस्तार व पसरलेला परिवार! त्या सर्वांसह शेवटीं त्याचा नाश झाला! जाग्यावर राहिलें काय? जें राज्य त्यानें कपटानें मिळविलें तें जागच्या जागीं राहिलें. त्याचा त्याग करून कुत्र्याप्रमाणें त्याला मृत्यूस शेवटीं कवटाळावें लागलें!

## पांडवांची धडपड

तिकडे पांडवही राज्य परत मिळविण्यासाठीं विराट नगरींत धडपडत होते. त्यांचेंही बेत चालले होते. त्यानाही राज्य प्राप्तीचा लोभ होता. त्या लोभापायीं त्यांना कर्तव्याकर्तव्याचा विसर पडला होता. आणि युद्ध पेटलें; त्यांत भीष्म, द्रोण कर्ण, शल्यादिकांच्या आहुत्या पडल्या. त्यांत त्यांचे गुरुजनही कामास आले. कृष्ण त्यांचा सहाय्यकारी होता. युद्धांत डावपेचही करावे लागतात. कपट डावपेच सारें कांहीं युद्धांत क्षम्य असतें. सर्व उपाय त्यांना हाताशीं धरावे लागले. सारे कौरव पटापट रणांगणावर मरून पडले. आतां ते निष्कंटक झाले. त्यांना आतां शत्रू म्हणून कोणी राहिला नाहीं. राज्य मिळालें. आतां त्यांनी त्या राज्याच्या सुखानें उपभोग घ्यावा कीं नाही? परंतु छे, तसें कुठून व्हायला?

## धर्मराजाची उपरति

श्री कृष्ण सर्व कार्य आटोपल्यानंतर स्वगृहीं निघून गेले. त्याबरोबर धर्माचे डोळे खाडकन् उघडले. राज्य मिळविले तें कोणासाठी व कोणतें मोल देऊन? त्याला पश्चाताप होतो. सद्विचार जागा होतो. तें एवढें मोठें राज्य; परंतु त्याला मातीमोल तृणवत् वाटूं लागलें! त्याला राज्याचा व सुखोपभोगाचा लोभ नव्हता. तसा लोभ असता तर त्यानें स्वेच्छेनें राज्यत्याग कां बरें केला असता? त्यानें जें केलें तें धर्मासाठीं, धर्मरक्षणासाठीं, श्री कृष्णाची तशी आज्ञा म्हणून केलें.

भगवान् श्रीकृष्ण सर्वत्याग करून चालते झाले त्यावेळीं अंतर्मुख होण्याची धर्मराजाला संधी मिळाली. हें राज्य नाशवंत आहे. त्यामुळें वाट्यास येणारे सुखोपभोग क्षणिक आहेत. यांतलें कांहीं एक चिरंतन काळ टिकणारें नाहीं. मग काय त्याचा

उपयोग ? सर्प ज्याप्रमाणें अंगावरील कात टाकून मोकळा होतो व दूर निघून जातो त्याप्रमाणें सर्वत्याग करून, सर्व वैभवावर पाणी सोडून धर्मराज बाहेर पडतात.

मी आतां लौकरच तुमचा निरोप घेऊन जाणार अशी श्रीकृष्णाची वार्ता कानीं आल्यापासून धर्मांचें मन विचलीत झालें होतें. मनांत कालवाकालव सुरू झाली होती. त्यानें आहारविहार सोडून दिले होते. अंगावर कपडाही अगदीं जरूर तेवढा ठेविला होता. धर्मराज अगदीं बेचैन झाले होते. त्यानें सर्वस्व त्याग करून संन्यास घेण्याची तयारी चाललेली होती. आपल्या मस्तकावरील राजमुकुट त्यानें आपला नातू परिक्षीत याच्या मस्तकावर चढविला होता.

## सर्वांकडून धर्माचा पाठपुरावा

धर्मराजाची ही उपरती सर्वांच्या हृदयास जाऊन झोंबली. ती त्यांना सहन करण्या पलिकडची होती. सारे नागरिक नातलग, सगेसोयरे, अंतःपुरांतील साऱ्या राण्या अत्यंत दुःखीकष्टी होऊन आक्रोश करूं लागल्या. युद्धानन्तर जी दुःखाची छाया सर्वांना व्यापून राहिली होती. त्याचीच ही पुनरावृत्ती होती म्हणा ना. सारे नागरिक म्हणत होते कीं हे प्रभो ! आम्हांला सोडून आपण कुठें चाललां ? आपल्या मागें आम्हीं जिवंत कसें रहावयाचें ? साऱ्या महिला स्फुंदतस्फुंदत आक्रोश करीत त्यांच्यामागून चालल्या होत्या.

आणि हे सर्व प्रकार चालू असतां धर्मराज कोणाहीकडे ढुंकूनसुद्धां पहात नव्हते. त्यांचें मन बिलकूल विचलीत झालें नव्हतें. ते अविचल होते. ते कान असून ऐकत नव्हते व डोळे असून पहात नव्हते. कोणाशीं बोलत नव्हते व प्रश्नाचें उत्तर देत नव्हते. त्यांना आतां आपला किंवा परका कोणी वाटत नव्हता. मंत्रीगण आक्रंदन करीत होता. स्त्रीवर्ग छाती पिटून रडत होता. धर्मराजास त्याचें कांहीं वाटलें नाहीं. महाराज परिक्षीत तर एखाद्या बालकाप्रमाणें आक्रोश करीत होते. धर्मराजाचे चारही भाऊ त्यांच्या मागून चालले होते. तेही कांहीं बोलत नव्हते. वडील बंधूचें सर्व बाबतींत अनुकरण ! सर्वांचीं, विशेषतः स्त्रियांचीं, मुखकमलें दुःखातिशयानें व उन्हानें सुकून गेलीं होती. असें हें आणखी किती वेळ चालावयाचें !

## कृपाचार्यांचा पोक्त सल्ला

ही परिस्थिति अवलोकन करून कृपाचार्यांस बोलल्याशिवाय रहावेना. ते सर्व कांहीं समजून चुकलेले होते. ते शेवटीं सर्वांना उद्देशून म्हणाले, "महाराज युधिष्ठीर आतां परमहंस पदाला पोहोंचले आहेत. त्यांनीं सर्व गोष्टींतून आपलें मन साफ काढून घेतलें आहे. आपल्या विनवण्याचा आतां त्यांच्या मनावर कांहींएक परिणाम होणार नाहीं व ते परत येतील अशी आशा करणें अगदीं व्यर्थ आहे. त्यांना आपण सर्वांनीं प्रेमानें निरोप द्यावा हेंच उत्तम. त्यांच्या जाण्याआड आतां आपण येऊं नये. त्याचा कांहींएक उपयोग होणार नाहीं."

### सारे जागच्याजागीं थबकले

करारी व निश्चित शब्दांत कृपाचार्य बोलत होते. त्यांच्या बोलण्याचा परिणाम झाल्याशिवाय कसा राहील! त्यांचें बोलणें संपत असतां सर्व मंडळी जागच्या जागीं थबकली. स्त्रिया खालीं बसल्या. पांडवांचें मार्गक्रमण पुढें पुढें चालूच होतें. तेवढ्यांत महाराज परिक्षीत धर्मराजास गांठण्यासाठीं अंगांत अवसान आणून पुढें सरसावले. त्यांनीं धर्मराजास साष्टांग प्रणिपात केला. त्यांच्या पायांनीं पावन झालेली धूळ आपल्या मस्तकास लाविली. परंतु धर्मराजांची नजर जी पुढें लागलेली होती ती तशीच होती. त्यांनीं परिक्षीताकडे जरासुद्धां वळून पाहिलें नाहीं. त्यांचें आगेकूच चालूच होतें.

महाराज परिक्षीत यांस वाटलें होतें कीं, धर्मराजानीं पाठ फिरविली तरी आपले दुसरे चार आजोबा मागें रहातील व त्यांच्या अनुभवी सहवासाचा लाभ आपणास घडेल. तेहि धर्मराजांच्या मागोमाग जात होते. परिक्षीत महाराजांच्यानें रहावेना. ते तडक पुढें सरसावले व त्या चौकांच्या वाटेवर आडवे राहिले, व ते म्हणाले, “ महाराज ! आपणहि मला सोडून कुठें चाललां ? मी काय करूं एकटा मागें राहून ? नका जाऊं आपण मला सोडून ! ”

### अर्जुनाचें अखेरचें बोलणें

ते शब्द ऐकून अर्जुनांचें हृदय कळवळलें. ज्याला हाताखांद्यावर लडिवाळपणें खेळवला, नाचविला त्याची ही हताश स्थिति ! कसें राहील त्याच्यानें दोन शब्द बोलल्याशिवाय !

अर्जुन दु:खावेग आवरून म्हणाला ‘ बाळा ! आम्हीं येण्याची शक्यता नाहीं. तूं आपला सर्वांना घेऊन परत जा. जन्मभर आम्हीं आमच्या वडील बंधूंच्या पावलांवर पाऊल टाकीत आलों. त्यांना कधीं अंतर दिलें नाहीं. त्यांचा शब्द कधीं पडूं दिला नाहीं. आणि आता अखेरीच्या वेळीं त्या पावन पावलांचा अपमान आमच्याकडून कसा बरें होईल जिकडे ते तिकडे आम्हीं ! ज्या दिशेनें त्यांची पावलें पडतील त्याच दिशेनें आमचींहीं पावलें पडावयाचीं. जा; आनंदानें जा. सुखानें राज्य कर. आमचे आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहेत.”

महाराज परिक्षीत यावर अत्यंत कष्टी व कांपऱ्या स्वरांत म्हणाले, “महाराज ! आपण सर्वचजण मला सोडून चालला तर मी कोणाच्या तोंडाकडे पाहूं ? मला आधार कोणाचा ? मला वेळ प्रसंगी सल्ला मसलत कोण बरें देईल ? कां आपण इतके कठोर बनतां ?”

### कोण कोणाचा नाहीं

अर्जुन सांत्वनवर शद्बांत म्हणाला, “ बाळा ! या जगांत कोण कोणाचा नाहीं. प्रत्येकानें स्वतःच्या पायांवर उभें राहून एकट्यानेंच चालावयाचें असतें. हा

सारा मायेचा पसारा आहे. अरे ! आमचें काय ? द्वारकानाथ श्रीकृष्ण प्रभू सदासर्वकाळ तुझ्या सांगाती असतांना तूं इतका कष्टी कां होतोस ? तुझें रक्षण करण्यास व वेळोवेळीं जरूर ती प्रेरणा देण्यास तोच सर्व समर्थ आहे. जा आतां; आम्हांला उगाच अडवूं नकोस." एवढें बोलून ते चौघेहि बंधू मार्गस्थ झाले. धर्मराज पुढें चाललेच होते. द्रौपदीहि त्याच्याबरोबर जात होती.

महाराज परिक्षितांचा निरुपाय झाला. सारें रोखठोक. बोलण्यासारखें कांहीं नव्हतें. परिक्षीत उमजले. त्यांनीं सर्वांना मागें वळण्याची विनंती केली. आतां सारी जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली होती.

दृष्टीआड होईपर्यंत सर्वजण त्या पांच नव्हे सहा पांथस्ताकडे पहात उभे होते. त्यांच्या आकृत्या दिसेनाशा झाल्या. तेव्हां प्रेमादरपूर्वक अखेरचें वंदन करून सर्वजणं मागें फिरले.

**पांडवांचें महाप्रयाण**

तें पांडवांचें महाप्रयाण होतें. धर्मराजानें स्वतःच्या मनाशीं त्याचा पूर्वींच विचारपूर्वक निर्णय घेतलेला होता. महाप्रयाण किंवा महाप्रस्थान हें न बोलतां कांहीं एक न खातां पितां अंमलांत यावयाचें असतें. चालतां चालतां शरीर पडेल तोच अखेरचा मुक्काम ! वाटेंत शारीरिक, मानसिक कष्ट होतील तें निमूटपणें सोसावयाचे. परंतु ज्यांचा पाठीराखा आनंदघन श्रीकृष्ण होता, ज्याची भक्ति पांडवांनीं अनन्यभावें केली, ज्याच्यावर पांचहि बंधूंची संपूर्ण निष्ठा तो भगवान कोणत्याहि प्रसंगीं आपल्या प्रियभक्तांना अखेरच्या क्षणीं कसा अंतर देईल ? या महायात्रेंत पांडवांना कोणत्याहि प्रकारचा त्रास झाला नाहीं. श्रीकृष्णाच्या कृपेनें ते परंधामापर्यंत सुखरूपपणें पोहोंचले व परमात्म्यानें त्यांना स्वतःमध्यें सामावून घेतलें.

---

भगवंताचे गुणानुवाद गातांना, त्याच्या रुपाचें चिंतन करतांना किंवा नामघोष करितांना प्रेमभरानें ज्याची वाणी सद्गदित होते, ज्याचें चित्त द्रवतें, जो अनुतापानें कधीं रडतो व भगवत्प्रसादप्राप्तीमुळें कधीं हंसतो, जो निर्लज्ज होऊन भगवद्गुण गातो व नामघोषानें सर्व दिशा गर्जून सोडतो, आनंदातिशयानें कधीं कधीं नाचतोहि—असा माझा भक्त त्रिभुवनाला पावन करितो—असें देव स्वतः सांगतात.

× × ×

"परम दयाळू व परम समर्थ असे भगवान् श्रीकृष्ण यांच्या कृपेची छाया आपल्यावर आहे असा दृढ विश्वास ठेवून वागणाऱ्या भक्तांना कसल्याही संकटांना भिण्याचें कारण नाहीं."

—गौरांग प्रभु

× × ×

# प्रतिमा पूजनाचें महात्म्य

**प्रतिमा पूजन हें भक्ताला कधींहि अपायकारक होणार नाहीं. तें कल्याणप्रद होत असतें. भक्तिभाव व श्रद्धा मात्र पाहिजे. मोठमोठ्या साधुसंतांनीं प्रतिमापूजनाद्वारें देव आळविला व तो आपलासा केला.**

**—सी. राजगोपालाचारी**

एखादी इमारत बांधण्याचें काम चालू असतें तेव्हां बांबू बांधून त्याच्या शिड्या चौफेर उभ्या करण्यांत येत असतात. त्यावर चढून घर बांधणीचें काम चालू असतें. घर बांधून झालें, तें पूर्ण स्वरुपाला आलें म्हणजे सभोंवार उभारलेल्या बांबूच्या शिड्या काढून टाकण्यांत येतात. मग त्यांची जरुरी रहात नाहीं. त्याप्रमाणें ज्यांना देव देवतांचे ध्यान करावयाचें असतें व मूर्ती हृदयांत सांठवून ठेवावयाची असते तेव्हां मंदिरांत जाऊन मूर्तिचे ध्यान करणें जरूर असतें. त्याशिवाय त्यांना एकाग्रचित्त होतां येत नाहीं. मन एका ठिकाणीं स्थिरावत नाहीं. तीर्थयात्रा करणें, देवळांत जाणें या गोष्टींची कांहीं विवक्षीत पायरीपर्यंत जरूरी असते, मग ती जरूरी पुढें रहात नाहीं.

**भक्तिभाव व श्रद्धा**

ईश्वर सर्वत्र व सर्वव्यापी आहे. भक्तिभाव व श्रद्धा पाहिजे. भक्तिभावपूर्वक केलेलें मातीचें लिंग हें देवाचेंच स्वरुप होय. ईश्वर सर्वव्यापी आहे. तसाच तो त्या लिंगांतहि असतो.

रामकृष्ण परमहंस यांस एकानें विचारलें कीं 'ही मूर्ती केवळ मातीची आहे. ती ईश्वरस्वरुप आहे हें कां म्हणून मानावयाचें ?' उत्तरादाखल रामकृष्ण म्हणाले, 'माती असो, दगड असो, कीं तांबें असो. तेंही भगवंताचें एकेक स्वरुप आहे असें कां मानीत नाहीं ? प्रत्येक वस्तुमात्रांत ईश्वर आहे. तो कणाकणांत व्यापलेला आहे. तो नाहीं असें ठिकाण नाहीं. मूर्ति तांब्याची असो. मातीची असो किंवा दगडाची असो. ईश्वर त्या प्रत्येकींत आहे. आपण हातांत तुळसीमाळ घेऊन जप करतों. त्या माळेंतील प्रत्येक मण्यांत ईश्वर आहे.'

मेघानें आच्छादलेलें आकाश, मेघवृष्टि, भयंकर तुफान, विकट हास्य हीं सर्व त्या पराशक्तीचींच स्वरुपें आहेत. पर्जन्यवृष्टि होऊन पाण्याचे पाट डोंगरपर्वतांवरून वाहूं लागतात. नदीनाले तुडुंब भरून जातात. अशा त्या नद्यांजवळ जे साधुसंत असतात ते पहाटेच्या प्रहरी व सायंकाळीं जातात व त्या जलाशयाला वंदन करून प्रार्थना करीत असतात कीं, "हे जलाशय, तुझी प्रसन्नता, निर्मळता व शांतता या सर्वांचा उदय आमच्या अंतःकरणांत होऊं दे. तुमचा पुरुषार्थ आमच्या ठायीं अवतीर्ण होऊं दे.

तुमचें तेज आम्हांला मिळूं दे. तुमचें प्रेम मातेप्रमाणें आहे. तुमच्याठायीं आपपर भाव नाहीं. तो भाव आमचा होऊं दे. तुम्हीं दुसऱ्यांवर उपकार करतां परंतु त्याचा कधी टेंभा मिरवीत नाहीं. ती पवित्र भावना आमच्या ठायीं जागृत होऊं दे." अशी प्रार्थना करून ते मुनीवर्य हातांत पाणी घेऊन तें आपल्या शरिरावर शिंडकावीत असत व पवित्र जलाचा एक घोट प्राशन करीत असत. किती आनन्द वाटत असे त्यांना ! तें जलाशयपान करीत असतां सर्वव्यापी भगवन्ताचें त्यांना स्मरण होत असे.

तेव्हां ईश्वर सर्वव्यापी आहे याची जाणीव होऊन आपण आपल्या मनाची एकाग्रता साधण्यासाठीं कोणत्याही वस्तूचे देवस्वरुप समजून तिचें पूजन व ध्यान कां करूं नये ? होय; मूर्तिपूजा त्याज्य मानणारेही लोक या जगांत आहेत; परन्तु त्यांच्याही पुढें कांहीं तरी ध्येय असतेंच; त्यांची आपण निंदा करण्याचें कारण नाहीं.

एक गोष्ट आपण निश्चीतपणें समजून घेतली पाहिजे कीं ईश्वर प्रत्येक कणाकणांत आहे. आपण अन्न खातों. त्याच्या प्रत्येक कणांत त्याचें वास्तव्य आहे. अन्नाचा घास घेतांना आपणास भगवंताचें स्मरण झालें पाहिजे. पूजा अर्चा करून झाल्यानंतर ध्यानीमनीं देवाची आठवण होत असतां अन्नग्रहण करणें हें किती तरी पुण्यदायक आहे.

**प्रतिमापूजनाचा वारसा**

आमच्या पूर्वजांपासून प्रतिमा पूजनाचा वारसा आम्हांला मिळालेला आहे. भगवान नाहीं कोठें ? मत्स्य, वराह, कूर्म यांच्या रुपानें तो नटला, तसाच राम कृष्णाच्या रुपानेंहि प्रगट झाला. तो सर्वांतर्यामीं व सर्वव्यापी आहे. तो पंढरपूरला विठ्ठलाच्या रुपानें किंवा इतरत्र नाना रुपानें नटलेला व प्रगट झालेला आहे. आपल्या भक्तांसाठीं त्यानें नाना रुपें धारण केलीं. वेगवेगळ्या स्वरूपांत भक्तांना त्याचा साक्षात्कार झाला.

एकदां रामानुज हे रस्त्यानें चालले असतां रस्त्याच्या बाजूला कांहीं मुलें खेळत होतीं. त्यांनीं तेथें श्रीरंगाची मूर्ति तयार करून तिच्याशीं त्यांचा खेळ चालला होता. ती मूर्ती पहातांच रामानुज तेथेंच थबकले. त्या मूर्तींत त्यांना खरोखर श्रीरंग दिसला. तिला त्यानीं साष्टांग दंडवत घातला. भगवन्ताच्या ध्यानांत ते इतके मग्न झाले कीं, कितीतरी वेळपर्यंत ते त्याच स्थितींत होते. अशी आहे ही जादू !

**सर्वव्यापी ईश्वर**

ईश्वर किंवा ब्रह्म सजिवांत आहे तसेंच निर्जीवांतही आहे ही जाणीव झाल्यानन्तर प्रतिमा पूजनामुळें आपलें कल्याणच होईल. पाहिजे श्रद्धा व भक्तिभाव. त्याच्या अभावीं सर्व व्यर्थ आहे. आजवर सर्व साधुसन्तांनीं प्रतिमा पूजनेच्याद्वारें देवाची भेट घेतली. देवाला त्यानीं जवळ केलें. भगवान रामकृष्ण परमहंस, महदाचार्य शंकर, माधव, रामानुज या सर्व्यांनीं प्रतिमेच्याद्वारें तें अगाध प्रेमस्वरुप अन्तरी सांठविलें व पाहिलें. यापेक्षां आणखी पुरावा तो कोणता पाहिजे ? त्याचप्रमाणें आम्हींही श्रद्धायुक्त अंतःकरणानें व भक्तिभावंपूवक प्रतिमापूजन केलें असतां त्याद्वारें आमचें कल्याण होईल हें निश्चित होय.

---

# श्री साईबाबांचें विश्वधर्माचें कार्य

लेखक : दा. शं. टिपनीस

**परस्परांत बंधुभाव निर्माण होण्याची आज फार जरुरी आहे. ती सर्वकाळचीच जरुरी आहे. आज माणुसकी लयाला गेलेली आहे. तिची सर्वत्र वाढ झाली पाहिजे. स्वामी विवेकानंदांनीं या कार्याचें महत्त्व ओळखलें होतें. श्री साईबाबांनींहि जीवनभर तेंच कार्य केलें.**

परस्परांत प्रेमभाव व सलोखा निर्माण करणाऱ्या विश्वधर्माची आज फार जरुरी आहे. पूर्वीही ती होतीच. बंधुभाव वाढीस लागला पाहिजे, परस्परांबद्दल प्रेमभाव वाटला पाहिजे. सारखेपणाशिवाय, समानध्येयाशिवाय एकमेकांची ओढ लागत नाहीं. सर्वांतर्यांनीं एकच चित्शक्ति वास करीत आहे ही गोष्ट प्रत्येकाच्या मनाला पटली पाहिजे व तीं परोपरीनें पटवून देण्यांत आली पाहिजे. विश्वधर्माशिवाय तंटे बखेडे, मत्सर व आपसांतील चुरस नाहींशी होणार नाहीं ही गोष्ट पूज्यपाद स्वामी विवेकानंद यांस पूर्णपणें पटली होती. त्यांना त्या काळींही जागतिक शांततेची आत्यंतिक तळमळ लागून राहिली होती. त्यासाठीं त्यांचा जीव तीळ तीळ तुटत असे. या गोष्टीचें चिंतन ते अहर्निश करीत असत. हें कार्य त्यांच्या हातून जरी तडीस गेलें नाहीं तरी त्यांनीं विचारांचा जो बहुमोल ठेवा भारतास देऊन ठेवला आहे त्याचा योग्य उपयोग भारतीय नेत्यांनीं करणें जरूर आहे. विशेषतः जगाला शांतिपाठ देणाऱ्या आजच्या भारतानें केवळ पंचशील सांगत न बसतां स्वामींनीं दर्शविल्याप्रमाणें एकादी योजना तयार करून जगाला खरा शांतिमार्ग उपलब्ध करून देणें हें भारतीय जनतेचें व सरकारचें कर्तव्य आहे; कारण यांत खऱ्या अर्थी पूर्ण निधर्मीपणा आहे. असो.

## स्वामी विवेकानंदांचें कार्य

कोणी काय करावें व करूं नये, कोणाचें काय कर्तव्य आहे वा नाहीं, याचा उहापोह करण्यापेक्षां अशा प्रकारचें कार्य आपणास करितां येईल कीं काय किंवा अन्य कोणी असा प्रयत्न केला असल्यास त्यास साहाय्य करून या कार्याची वाढ करतां येईल कीं काय याचा विचार करणें अधिक महत्वाचें आहे. स्वामी विवेकानंद यांचें सर्व कार्य विश्वधर्माला पोषक होतें. तेंच, स्वामींचें कार्य शिर्डीच्या श्री साईबाबांनीं पूर्णत्वास नेलें व नवीन आचार धर्माचा पाया घालून दिला आहे. याचा

विचार करावयाचा आहे. पण तत्पूर्वी मानवता म्हणजे काय, तिचा नाश कशामुळें होतो, तिची निर्मिती कशामुळें होऊं शकेल याचा विचार करणें आहे. कारण मानवता व विश्वशांति हीं एकत्र नांदत असतात.

वास्तविक माणसांत माणुसकी उपजतच असते. आपलेपणा, दया, अनुकंपा, सहानुभूति वगैरे माणुसकीचे गुण उपजतच असतात. माणुसकीचा उगम भावनेंत आहे, बुद्धींत नाहीं. भावना ह्या जशा उपजत असतात तशा त्या परिस्थितीनींही बनत असतात. बुद्धि भावनेला मारक आहे. यामुळें बुद्धिनिष्ठ गोष्टींत भावनेला थारा नाहीं व भावनाप्रधान गोष्टींत बुद्धिला वाव नाहीं. दोघांचे एकाच वेळीं एकाच ठिकाणीं अस्तित्व असूं शकत नाहीं. बुद्धींत भेदत्व व एकत्व आहे. एकत्वाचे परिच्छेदन करण्याची तिला संवय आहे. (सारासार विचार शक्ति). यामुळें बुद्धि ही पुष्कळवेळा एकत्वाला—एकीला विघातक होते. बुद्धीला परिच्छेदनाची जशी संवय आहे तशीच विश्लेषणाचीही संवय आहे. मनुष्यांत अहंकार आहे. अहंकाराची दृष्टी स्वार्थी आहे. अहंकार बलवान झाला कीं बुद्धिवर ताबा चालवतो म्हणजे आपल्याला सोईस्कर असें कार्य तिच्याकडून घडवून आणतो व तें न्याय्य आहे असें भासविण्यास तिला लावतो. अहंकाराच्या ठिकाणीं मालकी हक्काची जाणीव तीव्र असते. याचा अर्थ असा कीं माणसांतील एकत्व बिघडविणारी भेद निर्माण करणारी मुळांत बुद्धिही नसून तिला नाचविणारा अहंकार आहे.

अहंकार मणुसकीचा खरा मारेकरी आहे. अहंकार व्यक्तीला समाजापासून निराळा करतो. मालकी हक्काच्या भावनेमुळें माझें तुझें हा भेदद्वैत निर्माण होऊन एकत्वाचा भंग होतो. यामुळें स्वार्थ बळावून माणूस सत्तेच्या मागें धावूं लागतो अहंकाराचा आहार कधींही न शमणारा असल्यामुळें ही धांव सतत चालूच राहते. आपली सत्ता आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या क्रमांत माणूस चूर होऊन जातो. स्वार्थ व सत्तेनें त्याची बुद्धि आंधळी बनते. इतर गोष्टी चांगल्या असल्या तरी त्याला त्या दिसत नाहींत, समजत नाहींत, उमजत नाहींत व पटत नाहींत. स्वसत्ता स्थापनेसाठीं नाना स्वार्थी युक्त्या व प्रयुक्त्या व मार्ग शोधण्यांतच त्याची बुद्धि सदैव खर्च होत असते. या वृत्तीमुळें इतरांशीं मतभेद होतात. इतरांकडून अडथळे निर्माण होतात. यांतून काम, क्रोध, द्वेष, असूया, हेवेदावे निर्माण होऊन माणसांतील माणुसकी मरते व तंटेबखेडे माजून अंतिं यादव्या माजून लढाया होऊन विश्वशांति व तिच्या बरोबर इतर चांगल्या गोष्टी यांची राख रांगोळी होऊन जाते. या सर्वांचे मूळ अहंकार असल्यामुळें त्याची प्रथम व्यवस्था केल्या-खेरीज माणुसकीची—मानवतेची वाढ होणें शक्य नाहीं.

### अहंकार उपकारकही आहे

अशा प्रकारें अहंकार हा जसें विध्वंसक कार्य करतो तसें तो विधायकही कार्य करतो. अहंकाराच्या अंगीं धडाडी धैर्य व साहस हीं असतात. जें कांहीं जगांत चांगले झालें आहे तें मानवास अहंकारानें करावयास लावले आहे. अहंकाराच्या पोटीं क्रिया शक्ति कार्य प्रवीण करणारी आहे. माणसांत मुळींच अहंकार नसेल तर माणूस क्रियाशून्य

बनेल. यास्तव माणसाचे व्यवहार चालू राहण्यास अहंकाराची जरूरी आहे. विधायक व विध्वंसक दोन्हीं कार्यें अहंकाराकडून होत असतात. यामुळें अहंकार नसावा हें जितकें खरें आहे तितकेंच तो असावा हेंही खरें आहे. धरलें तर चावतें व सोडलें तर पळतें असा हा पेंच आहे. तो सोडविला तरच मानवता व जागतिक उन्नति दोन्ही साधूं शकतील.

हा तारेवरचा खेळ कसा साधावयाचा? कामाला मस्त बैल सर्वांत उत्तम. यास्तव त्याला बडवून त्याची खच्ची करून मग कार्यास लावतात, यामुळें त्याची शक्ति कामास लागून कार्य होतें. अहंकाराच्या बाबतींत असाच प्रकार आहे. त्याला चांगला बडवावा लागतो. त्याची खच्ची करावी लागते. अहंकाराला गुलाम म्हणून राबविला पाहिजे. त्याच्या आहारीं जातां कामा नये. ही गोष्ट कशी साधावी याचें मार्गदर्शन अध्यात्मशास्त्रांत आहे. त्याची दखल विश्वशांति स्थापनेच्या योजनेंत घेणें आवश्यक आहे.

एथपर्यंत माणसांतील माणुसकीचा-मानवतेचा नाश मुख्यतः कशामुळें होतो, याचा विचार झाला. परंतु हा झाला नास्तिपक्षीं विचार, त्यानें कार्यनिष्पत्ति होऊं शकत नाहीं. यामुळें अस्तिपक्षींही विचार करणें जरूर आहे. कोणत्या गोष्टीमुळें माणुसकीची वाढ व्यक्तींत होऊं शकते याची दख्खल घेणें आवश्यक आहे.

## माणुसकीचे शत्रु

माणुसकीचा जन्म आपलेपणाच्या पोटीं होत असतो. केवळ एक ध्येयावर आधारलेला आपलेपणा एकत्व टिकवूं शकत नाहीं. ध्येयप्राप्तिनंतर हा आपलेपणा मावळतो. या गोष्टीची भारतीय इतिहासांत अगदीं ताजी साक्ष आहे. स्वातंत्र्यप्राप्तिपूर्वी जे लोक एकदिलानें, निष्ठेनें व आपलेपणाने एकत्रित आले तेच ध्येयप्राप्ति नंतर मतभेदामुळें विलग झाले व त्यांच्यांतील आपलेपणा मावळला, भंग पावला. यास्वत टिकाऊ आपलेपणाची बैठक केवळ समान ध्येयावर आधारली न जातां माणसामाणसांत असूं शकणाऱ्या एखाद्या समान गोष्टीवर अधिष्ठित असेल तर तो टिकाऊ होईल; ज्यावेळीं पतिपत्नीमध्यें विषयवासता वगळून एकमेकांबद्दल एक विशिष्ट ओढ निर्माण होते, त्यांच्यांत एक विशिष्ट प्रेम वा आपलेपणा निर्माण होतो त्यावेळीं ती एकरूप होऊन एकमेकांच्या सुखासाठीं झटत असतात; स्वार्थत्याग करीत असतात व यामुळें त्यांचा संसार हा सोन्याचा संसार होतो. कोणती तरी अंतःर्गत शक्ति त्यांना एकमेकांकडे ओढते, त्यांच्यांत एक प्रकारचा प्रेमा, आपलेपणा निर्माण होतो. मुलाच्या ठिकाणीं मातेची असणारी ओढ—वात्सल्य ही एकत्वाचीच साक्ष आहे. मातेच्या ठायीं मुलाबद्दल एक प्रकारचें शुद्ध पवित्र प्रेम वास करीत असतें. त्यामुळें मातेच्या स्वार्थत्यागास सीमा नाहीं. निष्पाप व निर्व्याज प्रेमानें भरलेल्या अज्ञानी बालकाच्या ठिकाणीं या अंतर्गत शक्तीचा तीव्रपणा विशेष असल्यामुळें मातेलाच नव्हेतर इतरांनाही बालक झटकन् आकर्षित करतें. अशा प्रकारची ओढ माणसामाणसांत निर्माण झाली कीं माणुसकी उदयास आली

म्हणून समजावें. आपण जातिधर्मानें, बुद्धीनें, शरिरानें निराळे असलों तरी आपणा सर्व मानवांत जातिधर्म निरपेक्ष अशी एक गोष्ट, एक शक्ति समान आहे, याची जेव्हां माणसास जाणीव होईल तेव्हां त्यांना एकमेकांबद्दल आपलेपणा, ओढ वा प्रेमा वाटूं लागेल, व त्याच वेळीं खरी माणुसकी उदयास येईल व मग माणसें एकमेकांच्या सुखासाठीं झटूं लागतील व विश्वशांतीचें स्वप्न साकार होईल. यास्तव मानवांना त्यांच्यांतील एकत्वाची जाणीव करून देणें, ही जाणीव करून घेण्यास मानवांना प्रवृत्त करणें हें विश्वधर्मांचें प्रमुख कार्य असलें पाहिजे.

## आचारधर्माची जरूरी

अशा प्रकारची जाणीव निर्माण होण्यास कांहीं तरी आंखीव मार्ग असला पाहिजे. केवळ व्याख्यानें वा प्रवचनें या योगें ही गोष्ट साध्य होणार नाहीं. आचरण होऊं शकेल, जे गुण ही जाणीव देण्यास कारणीभूत होतील अशा गुणांची वाढ ज्या योगें होईल अशा गोष्टी करण्यास लावणारा आचारधर्म पाहिजे. अहंकार स्वार्थ, लोभ वगैरे ऐवजीं क्षमा, शांति, दया, दान व दमन या गुणांची वाढ झाली पाहिजे. गीतेंत सांगितलेली दैवी संपत्ती कमावली पाहिजे. हें ज्यायोगें साधेल असा आचारधर्म जरूर आहे. उठल्यापासून निजेसतोपर्यंत माणसानें काय करावें व कसें वागावें याच पायरी पायरीनें आणखी केलेला आचारधर्म पाहिजे. माणुसकी हें तत्त्व नसून ती वगणूक आहे. याला डावलणारा आचारधर्म विश्वशांतीस उपयोगी नाहीं. हा आचारधर्म जागतिक स्वरूपाचा असल्यामुळें तो जनतेला अर्थहीन असलेल्या अशा विद्वत्ताप्रचुर जाड्या शब्दांच्या वेष्टनांत गुंडाळलेला नसावा. एकाद्या रानवटालाही समजेल अशा साध्या सुध्या भाषेंत तो व्यक्त केलेला असला पाहिजे. नाहींतर अर्थासाठीं वादावादी होऊन तंटेबखेडे माजतील व सर्वच मुसळ केरांत जाईल; जगांतलि माणसांतील बरीचशी कटुता बेजाबदार जिभेमुळें निर्माण होत असल्यानें प्रथम आपल्या जिभेवर माणसानें ताबा मिळविला पाहिजे. दया, दान म्हणजे त्याग याची संवय जडली पाहिजे. हरएक गोष्टींत दमन करतां आलें पाहिजे. अशा प्रकारच्या दैवी गुणांची वाढ झाली पाहिजे. या गोष्टीं करण्याची संवय माणसाच्या अंगीं जडली पाहिजे व ती दैनंदिन जीवनांतील हरएक लहान मोठ्या गोष्टींत दृग्गोचर झाली पाहिजे. या सर्व गोष्टीं करायला लावील अशा आचारधर्मांची आज जरुरी आहे.

श्री साईबाबानीं विश्वधर्माला पोषक, माणसांत बंधुभाव जागृत करण्याचें कार्य जीवनंभर केलें. त्यांच्या कार्याकडे आपण या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. केवळ पाहिलें पाहिजे एवढेंच नव्हे, तर त्या मार्गानें आपलीं पावलें अहर्निश पडत जातील यासाठीं झटलें पाहिजे.

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद



ले० : एक साईभक्त

अध्याय आठवा

श्री गणेशास, सरस्वतीस, गुरूस, कुलदेवतास, सीतारामचंद्रास, सद्गुरू साईनाथास नमस्कार. साई हिंदु किंवा यवन जी बाबाचें निजस्थान झालीं, त्या शिरडीचें किती मोठें भाग्य या विषयीं मागील अध्यायांत कथन झालें. आरंभीं बाबा केवळ ल्हान पोर म्हणून व मग वेडे फकीर म्हणून प्रसिद्धीस आले आणि उकिरड्यावर त्यांनीं कशी सुंदर बाग उठविली, पुढें कालांतरानें त्याच जागेवर मोठा वाडा उभारला गेला आणि बाबाच्या धोती, पोती, खंडयोग यांचें वर्णन झालें. भक्त कैवारी साईनाथ त्यांनीं स्वतःचें शरीर झिजवून किती अपाय सहन केले, याचें वर्णन मी किती करूं ?

आतां नरजन्माचें महिमान, साईची भैक्ष्यवृत्ति, बायजाबाईचें सन्त सेवन, बाबांचें भोजन कौतुक, तात्या, बाबा आणि म्हाळसापती तिघे मिळून मशीदींत कसे झोंपत व श्रीसाईसमर्थ राहण्यास खुशालचंदाचे घरीं कसें जात याची माहिती श्रोतेहो, आतां ऐका.

वर्षानुवर्षे आपला जन्म निद्रितावस्थेंतच जात असतो आणि उरलेलाही आपणास स्वस्थपणानें भोगवत नाहीं. बाळपणीं खेळांत दंग, तरुणपणीं तारुण्याचे चाळे आणि वृद्धापकाळीं आपण अनेक व्याधींनीं त्रस्त असतों. अशी ही आपली अवस्था. जन्माला यावयाचें, खाऊन पिऊन शरीर चांगलें पुष्ट बनवावयाचें, श्वासोच्छवास करीत दीर्घायुष्य जगावयाचें, हीच या जन्माची इतिकर्तव्यता. वास्तविक पाहातां परमात्म प्राप्ति हेंच आपल्या आयुष्याचें ध्येय असावयास हवें; नाहींतर श्वानसूकरादि अनेक जीवजन्तूंत व प्राण्यांत आणि आपल्यांत काय फरक आहे बरें ? कुत्रींहीं आपली पोटें भरतात आणि यथेष्ट प्रजोत्पादनहि करतात. मग नरदेहाचें तें काय एवढें महत्व. दोघांची सारखीच स्थिती. पिंडपोषण आणि मैथून हेंच जर नर जन्माचें सार्थक व हेंच त्यांचें पर्यवसान, मग तो नरजन्म निरर्थकच नव्हे कां ? आहार–निद्रादि चतुष्टयांत आयुष्यक्षय केला तर श्वानांत आणि मानवांत काय फरक आहे. याविषयी विवेक करून निर्णय घेणें बरें. हेंच जर नरदेहाचें सार्थक म्हटलें तर या पृथ्वीवर झाडें काय थोडीं निर्माण होतात. लोहाराचा भाता पण हवा आंत घेतो आणि बाहेर सोडतो; तसेच श्वानापिकांनाही पुष्टता यते. खरें

सांगावयाचे म्हणजे, मनुष्यप्राणी मुक्त आहे. तो स्वतंत्र आहे; निर्भय आहे आणि शाश्वत आहे; ही जाणीव होते तीच या जन्माची खरी सफलता होय. आपण कोठून आलों; या नर जन्माचें काय कारण घडलें. यांतील बीज जो जाणतो तोच प्रवीण. नंदादीपाची ज्योत प्रारंभीं आणि शेवटीं एकच दिसते; परंतु क्षणाक्षणाला ती वेगळी असते; तशीच या नरदेहाची स्थिती आहे. बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य या अवस्था सर्व जनांस प्रकटपणें दिसून येतात. आणि कोणासही न कळतां स्वाभाविकपणें त्या येतात आणि जातात. जी अवस्था दृष्टीस पडते ती एका क्षणांत नाहींशी होते. तरी देखील अपरामितपणें ती एकच अशी भासते. त्याचप्रमाणें हा आपला देह ह्या क्षणीं आहे तो त्या क्षणाअंतीं पूर्वीचा राहिलेला नसतो. क्षणोक्षणीं त्यांत बदल होत असतो. हा देह इतका कुलक्षणी आहे कीं तो मळमूत्राची मोरी असून कफ, पूं व लाळ यांची घाणी आहे. प्रत्येक घटकेला तो मृत्यूच्या जवळ जात आहे. हें आपलें शरीर कृमि कीटकांचें घर असून नाना रोगांचें आगर आहे. तें आज आहे तर उद्या नाहीं, असें क्षणभंगूर आहे. हा मानवी देह मांस, रक्त व स्नायूंचा बनलेला आहे. तो अस्थिचर्माचा मलमूत्रादि दुर्गंधीनें भरलेला सांगाडा असला तरी जिवाला अडकवून ठेवण्याचा खोडा आहे. त्वचा, मांस, रक्त, स्नायू, मेद, मज्जा अस्थि, वायु अशीं अमंगल अंगें या देहाचीं असून तो अल्पायू आहे. हा आपला नरदेह इतका अमंगल, नश्वर आणि क्षणभंगुर असला तरी आपणांस परमेश्वर प्राप्ति याच्याच करवीं व्हावयाची आहे. नेहमींच जन्म मरण याच्या मागें लागलें आहे. तो भयानें सदैव ग्रासलेला असून कानाला कान लागतो न लागतो तोंच त्यांतील प्राण निघून जाईल. कांहीं प्राणी जन्मतांच मृत्यूला बळी पडतात. कित्येक अनेक दिवस जगतात. मार्कंडेयाचें आयुष्य जरी त्यांना लाभलें तरी कालगति कोणालाही चुकत नाहीं.

अशा या क्षणभंगूर नरदेहाचा कांहीं काळ पुण्यश्लोक कथा वार्तांत खर्ची पडला तर गेलेला काळ संग्रहीं पडेल. त्या व्यतिरिक्त सारें व्यर्थ आहे ही जाणीव खरोखरीच झाली तरच मानव जन्माला आल्याचें सार्थक आहे; परंतु अनुभवाशिवाय कोणाला या विषयीं विश्वास पटत नाहीं. परंतु हा अनुभव मिळण्याकरितां जरूर तो अभ्यास केल्यानें शाश्वत सुखाची प्राप्ती होऊन जिवाला हें वैभव साधतां येतें. परंतु हा जीव मोठा विलक्षण आहे. ईश्वर कृपेनें त्याला स्त्री, पुत्र, समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य, अगणित संपत्ती आणि वैभव लाभलेलें असलें तरी तो केव्हांहि तृप्तच नसतो. शाश्वत सुख आणि शांति हें ध्येय चित्तांत ठेवून सर्वांभूतीं भगवंत आहे ही भावना ठेवून उपासना केल्यास ती परम प्राप्तीदायक ठरणार आहे. रुधीर, त्वचा आणि हाडामांसाचा हा देह सांगाडा परमार्थ प्राप्तीचें साधन असला तरी त्याचें ममत्व सोडा. त्याला आपला सेवक मानून राबवून घ्यावें. त्याला डोक्यावर नाचवून त्याचे लाड पुरवूं नका व नरकाचें साधन करूं नका. जरूरीपुरतें त्याला अन्न, आच्छादन पुरवून जरूर तितकेंच त्याचें लालनपालन करून जन्ममरणाचा फेरा चुकविण्यासाठीं अध्यात्मिक

उन्नतीच्या मार्गाकडे त्याला राबवा. जन्ममरणाच्या चक्रांत सांपडलेला, प्रतिक्षणीं विनाशोन्मुख, क्षणिक सुखाला लाल—चावलेला नेहमींच दुःखी आहे तो ! आकाशांत विज चमकते व क्षणांत गुप्त होते, तसेंच सागरावर लाटा येतात आणि क्षणांत नाहींशा होतात, तसाच हा देह आतां आहे आणि मग नाहीं. देह, घरदार, स्त्री, मुलेंबाळें हीं सर्व नाशवंत जाणून तो स्वतःच उमजूं शकत नाहीं. हा जीव जन्ममरणाचे फेरे फिरत असतो; परंतु ह्याच्यांतून सुटका कशा रीतीनें होईल याचा तो क्षणभरहि विचार करीत नाहीं. नित्य कुटुंबाची भर करीत असतो तो. आयुष्य भराभर जात चाललें आहे. काळ न आयुष्य गणना करण्यात तो तत्पर असतो. त्या कर्तव्याचा त्याला विसर पडत नाहीं. आणि शेवट जवळ आला म्हणजे एक क्षणभर देखील तो थांबूं शकत नाहीं. कोळी ज्याप्रमाणें जाळें ओढतो तसाच मृत्यूच्या वेळीं जीव तडफडत असतो. महत् भाग्यें करून व पूर्वपुण्याईमुळें हा नरदेह लाभला आहे तेव्हां आपलें हित साधून घ्यावें. भगीरथ प्रयत्नामुळेंही नरदेह प्राप्त होत नाहीं. केवळ यदृच्छेनें हा मिळाला आहे. करितां तो व्यर्थ मातींत मिळवूं नका. पुढील जन्मीं कांहीं करूं म्हटलें तर हा हातचा गेला तर निश्चितपणें पुढें तो प्राप्त होईल असें जो मानतो तो मूर्खच होय.

( पुढें चालू )

---

# आपल्या आकांक्षा

# आटोक्यांत ठेवा

तूं एकदां आपल्या मनाला विचार कीं, तुझी इच्छा काय आहे ? तुला काय काय पाहिजे ? मनानें आपल्या ज्या कांहीं इच्छा असतील त्या सांगाव्या. आपण त्या ऐकाव्या; परंतु एका अटीवर. त्या इच्छा परिपूर्ण झाल्यानंतर पुनरपि कशाचीहि इच्छा, अपेक्षा करावयाची नाहीं; परंतु ही अट कबूल करील तर तें मन कसलें ? एकदां इच्छिलेलें व जरूर तें मिळालें कीं, त्याच्या मागोमाग दुसरी इच्छा खडी होणारच. इच्छा करण्यास अंत ना पार. राजा असो वा रंक असो. वाटेल तेवढें पुढ्यांत आणून ठेवा. तेवढ्यानें समाधान होत नाहीं. आणखी कांहीं तरी मिळालें पाहिजे व तेवढ्यासाठीं मन असंतुष्ट रहातें. मन आहे तेथें इच्छाही आहेच. जें जवळ नाहीं, ज्याची प्राप्ति होत नाहीं त्याची इच्छा करायची, त्याच्यासाठीं धडपडत रहावयाचें व सदासर्वकाळ असमाधानांत रहावयाचें ही मोह वृत्ती आपल्या मनाची ! मनाचा हा स्वभावच आहे. इच्छिलेलें मिळालें ना ! नां अस्वस्थता कां म्हणून ? परंतु नाहीं स्वभावगुण कुठें जाईल ? मनाच्या या स्वभावधर्माप्रमाणें वागत गेल्यास कोणीही सुखी होणार नाहीं. अनेक जन्म घेतले तरी

मनाच्या इच्छा पूर्ण करतां येणार नाहींत. यासाठीं जें जवळ असेल, जें प्राप्त झालें असेल तेवढ्यावर राजी होऊन समाधानपूर्वक जीवन कंठावयाचें अशी मनाला शिकवण दिल्याखेरीज कोणीही या जगांत सुखी होणार नाहीं.

× × ×

या जगांत मी अमूक अमूक गोष्टी करणार, त्या पार पाडल्याशिवाय रहाणार नाहीं अशी ईर्षा हवी कशाला? जें पूर्वकर्मानुसार तुझ्या वाट्याला आलें असेल तें आनन्दानें भोग. मग तें सुख असो वा दुःख असो. जें कांहीं वाट्यास आलें असेल तें तुझ्या पूर्वकर्मांचें फल आहे. त्याच्या जोडीला आणखी नव्या इच्छा, आकांक्षा उभ्या करूं नकोस. जगाचें भलें करण्याची, जगाची सुधारणा करण्याची उठाठेव तुला कशाला! अंथरूण पाहून पाय पसरावे! एक एक इच्छा उभी करशील तर ती पूर्ण होणें राहील बाजूला; तूं मात्र पुन्हां पुन्हां जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडशील. या शरिराच्या वाट्यास जीं जीं प्राप्तकर्तव्यें आलीं असतील तीं पार पाड. आनंदानें पार पाड. ईश्वराचें चिंतन कर. निरीच्छ हो. शांततेनें काळ घालविण्याचा सराव कर. नहमीं आनंदानं रहा. खंत वा काळजी कशाचीही बाळगूं नकोस. तुझ्या काळजी बाळगण्याचा उपयोग कांहीं नाहीं. उगाच कशाला शीणतोस? शक्तीप्रमाणें जबाबदाऱ्या शिरावर घेऊन त्या पार पाड. ईश्वर चरणीं मन एकाग्र कर. जें हातून होण्यासारखें असेल तेवढें कर व जें होण्यासारखें नसेल त्याच्या मागें लागून नसतें दुःख मानून घेऊं नकोस. नेहमीं प्रसन्न रहा.

---

अंतःकरणाच्या प्रेममय भावनेनें श्रीहरीला शरण जाण्याचा जो क्षण त्या क्षणापासून जिवंतपणास प्रारंभ होतो! श्रीहरीची, आत्मारामाची अत्यंत विस्मृति हा मृत्यु होय; त्याचें स्मरण, चिंतन, अनुसंधान, गुणगायन हें जीवन होय.

× × ×

क्षमा पेरूं तर प्रेमाचें पीक पदरांत पडेल.

लक्षावधि सहानुभूतीच्या शब्दांपेक्षां सहानुभूतीनें ओतप्रोत भरलेल्या अंतःकरणाची मातब्बरी फार मोठी आहे. अंतःकरणाच्या प्रवृत्तीनुरूप कृती घडत असते. शब्दांपेक्षां प्रत्यक्ष कृतीच महत्वाची व खरीखुरी बोलकी असते.

— फ्लोरेन्स नाइटिंगेल

× × ×



# साधकासाठीं मार्गदर्शन

—स्वामी शिवानंद

आपल्या ठायीं अध्यात्माची वाढ व्हावी, ज्याला दैवी जीवन म्हणतात तें आपल्या वाट्यास यावें असें ज्याला वाटतें त्याचा तो हेतु तडीस जावयाचा असल्यास तो चैनीच्या व सुखासीन रहाणीनें तडीस जाणें कठीण आहे. अशा माणसानें कष्टाचें जीवन कंठिलें पाहिजे. चणे खावे लोखंडाचे म्हटलें आहे तें उगाच नाहीं.

परंतु त्याचबरोबर हेंही लक्षांत बाळगलें पाहिजे कीं दैवी जीवनाची ज्याला उत्कंठा लागून राहिली आहे त्याचें शरीर धडधाकट असलें पाहिजे. अशक्त माणसाचा तो मार्ग नव्हे. अशक्त माणसानें आपणास न झेपणाऱ्या साधनेकडे वळूं नये. प्रथम त्यानें शरीर कमवावें, निरोगी बनावें. साधनेचा मार्ग कष्टांनीं व्यापलेला आहे व कष्ट अशक्त व रोगी माणसाकडून होऊं शकत नाहींत.

## दोन मारेकरी

असहिष्णुता व अंधश्रद्धा हे दैवी मार्गावरील दोन मारेकरी आहेत. त्यांच्यापासून आपण दूर राहिलें पाहिजे. त्यांचा संपर्क आपण लावून घेतां कामा नये.

दैवी जीवन ही कोणत्याही एका राष्ट्राची किंवा एका व्यक्तीची मक्तेदारी नाहीं. सर्व राष्ट्रांतील व समाजांतील तसेंच कोणत्याही धर्मांतील व्यक्तिमात्राला दैवी जीवनाच्या मार्गानें जाऊन स्वतःचा उद्धार करून घेतां येतो.

अध्यात्मिकता, दैवीभावना अंगी आणण्यासाठीं प्रत्येकानें झटावें; कारण तेंच मूलभूत कल्याणकारी तत्व आहे. सत्य, शांतता व सुख या तिघांचाही त्यांत समावेश होतो.

निरभिमानता, त्याग, उच्च आकांक्षा व ध्यानधारणा यांच्या सहकारानें अध्यात्मिकता आपल्याजवळ येऊं शकते.

औदार्य, योगप्रणीत शिस्त, सबुरी, शांतता व ध्यानधारणा या गुणांचं पालन व परिपोषण केल्यानें मनुष्याला आत्म प्रचीतीची खूण पटूं शकते.

## समतोल जीवन

निष्काम सेवाभाव व अध्यात्मिकता यांचें फार जवळचें नातें आहे. तीं एकमेकांस पोषक आहेत.

अध्यात्मिक जीवन म्हणजे समतोल जीवन. यश मिळो वा अपयश मिळो तुमच्या मनाचा कांटा खालीवर होता कामा नये. मनाचा काटा समतोल राहिला पाहिजे. त्यानें जरासुद्धां हेलकावा खातां कामा नये. नफा होवो किंवा नुकसान होवो. कोणी मान देवो किंवा अपमान करो. मन निश्चल, समतोल राहिलें पाहिजे. अध्यात्मिकता अंगी बाणल्याशिवाय हा समतोल साधतां येत नाहीं.

ज्याच्या अंगीं अध्यात्मिकता बाणली आहे, जो दैवी जीवन चाखूं लागला आहे, तो कोणत्याही प्रसंगीं डगमगत नाहीं. त्याच्या मनांत वादळ उत्पन्न होत नाहीं. तो सदा शांत, व गंभीर व एकचित्त असतो. सैरावैरा धांवत सुटत नाहीं.

15

## साधनायुक्त जीवन

साधना ( ध्यानधारणा, जप व प्रार्थना ) ही आमच्या जीवनाची सहज घडण होऊन राहिली पाहिजे. त्या गोष्टी आमच्याकडून सहजासहजीं घडत गेल्या पाहिजेत. तो दैनंदिन जीवनाचा आवश्यक भाग होऊन राहिला पाहिजे.

साधू बना; परंतु पोषाखानें नव्हे तर नित्याचरणानें. साधुत्व क्षणोक्षणींच्या जीवनांत उतरलें पाहिजे. पावित्र्य, सत्य, व ज्ञानपिपासा यांची कास आपण केव्हांही सोडतां कामा नये.

याच जन्मीं देवस्वरुप होण्यासाठीं झटा. अहर्निश प्रयत्न करा; व इतरांसही त्या मार्गानें घेऊन जा. 'आपणासारिखे करिती तात्काळ.' खरा संत तोच होय.

---

# " अल्ला मालिक अखंड वदनीं "

**हे माझ्या साईनाथा ! किती गोड गोड तव नाम ।**
**आनंद झाला माझ्या मनाला ॥ धृ० ॥**

**लुंगी नेसुनी सदैव राही ।**
**नाम घेवूं बाबा साई ॥ १ ॥**
**काय सोहळा भक्त गणांचा ।**
**नाच पहावा भक्त सख्याचा ॥ २ ॥**
**भक्त धांवती तुझ्या दर्शनीं ।**
**सदैव गाती तुझींच गाणीं ॥ ३ ॥**
**योग बलाच्या अद्‌भुत लीला ।**
**भक्त जनांना तूं दाखविल्या ॥ ४ ॥**
**हिंदु-मुस्लीम राव रंकही ।**
**तुझिया ठायीं भेदच नाहीं ॥ ५ ॥**
**" अल्ला मालिक अखंड वदसी । "**
**राम भजा हो जनीं बोलसी ॥ ६ ॥**
**अखंड धुमते धुनीं मशिदीं ।**
**पापक्षालना जमते ही उदी ॥ ७ ॥**
**धन्य धन्य ही तुझीच शिरडी ।**
**तुझिया नामें ही दुमदुमली ॥ ८ ॥**
**मंत्र स्मराहो श्रद्धा-सबुरी ।**
**चिंता-आशा हाच निवारी ॥ ९ ॥**
**काव्य पुष्प हें माझें साई ।**
**सदैव अर्पिन तुझिया पायीं ॥ १० ॥**

**—रमेश महादेव कुबल**

# मुमुक्षू होण्याचा मार्ग

**मुमुक्षु होण्याचा मार्ग म्हणजे ईश्वर प्राप्तीचा मार्ग. प्रत्येक माणसाला त्या मार्गानें जाऊन आपलें ध्येय गांठतां येणें शक्य आहे. परंतु त्या मार्गानें जाण्याचा अधिकार कोणाला प्राप्त होतो, आपल्या वाट्याला मुमुक्षुत्व कशामुळें येतें व त्यासाठीं काय करणें जरूर आहे, याचें यथाशक्ति स्पष्टीकरण करण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.**

या जगांत प्रत्येकानें मुमुक्षु होण्याची आकांक्षा बाळगून त्यासाठीं अहोरात्र झटलें पाहिजे. ज्याला मोक्षाची तहान लागलेली असते, तो मुमुक्षु. नाना प्रकारच्या बंधनांनीं आम्ही जखडले गेलेले आहोंत. किती आणि कोणत्या प्रकारची बंधनें त्यांना अंत ना पार! या देहाची किती लालसा वाटते आपणाला! अहंकार तर आमच्या बारशाला पुजलेला आहे! या संसारांत आम्हीं सुखदुःखाच्या बंधनानीं जखडले गेले आहोंत. अशा या सर्व बंधनापसून आपली सुटका व्हावी यासाठीं जो अहर्निश धडपडतो तो मुमुक्षु. ही सुटका करून घेण्याची मनाला तळमळ लागून राहिली पाहिजे. ती जिवंत व जागती तळमळ पाहिजे. ती अहर्निश आचरणांत आणली गेली पाहिजे. जितकी तळमळ तीव्र तितकी त्या मार्गावर आपली उत्तरोतर प्रगती होत असते. या कार्यांत शिथीलता उपयोगाची नाहीं. शिथीलता निर्माण झाली म्हणजे आपण पतनाच्या मार्गानें जाणार हें निश्चित होय. ही एकप्रकारची साधन सामुग्री आहे. ती प्रखर असली पाहिजे. ती सदा जागृत राहून आचरली गेली पाहिजे. जो सुख, लोभ व सुखासीनतेसाठीं धडपडणारा, सुखोपभोगासाठीं नेहमीं आसावलेला त्याचप्रमाणें इच्छित सुख नाहीं मिळालें तर दुःखीकष्टी होणारा, त्याला मुमुक्षु म्हणतां येणार नाहीं. त्याचें भवितव्य केव्हांहि उज्वल असूं शकणार नाहीं.

## विचारी बना

या संसारांत कांहीं कांहीं गोष्टींची आपणास भयंकर आसक्ति वाटत असते. परंतु ती आसक्ति विनाशाप्रत व दुःखाप्रत नेणारी असते याचा विचार आपल्या मनांत कधीं येत नाहीं. तो विचार मनांत आला पाहिजे. हीं बंधनें आहेत तीं केवळ अज्ञानामुळें आपणास चिकटतात. ज्ञानी माणूस त्यांच्यापासून नेहमी दूर रहात असतो. ज्ञान हें विचारशक्तीची कास धरल्याशिवाय मिळत नाहीं. तुम्हीं विचाराकडे वळलां, तुमची विचारशक्ती जागी झाली म्हणजे मग तुम्हांला मुमुक्षु होण्याचा मार्ग सांपडेल. विचारच करायचा नाहीं, कसेंतरी वागायचें, सुखदुःखाचे प्रसंग येतील तसें त्यांना तोंड द्यावयाचें, याला का जीवन म्हणतात. हें विचारी नव्हे

16

तर अविचारी जीवन होय. हेंच जीवन आपण जगत आहोंत. त्याला ठोकर देण्याची बुद्धि झाली पाहिजे. तशी ती झाली म्हणजे परमानंदपदाकडे जाण्याचा तुमचा मार्ग सुलभ होईल.

विचारशक्ति ही एक प्रभावी शक्ति आहे. तुम्हीं आपल्या अंतःकरणांत केवळ पवित्र व निःस्वार्थीपणाचे विचार मनांत घोळवा; त्यांचें सदैव चिंतन करा. आणि मग पहा, तुमच्या मनाला प्रसन्नता व शांतता वाटूं लागेल.

अहो! स्वर्ग आणि नरक हे आम्हीं आमच्या विचारशक्तीच्या बळावर निर्माण करीत असतों. पाप आणि पुण्य, प्रकाश आणि अंधःकार हीं तुमच्या हातांत आहेत. तुमच्या विचारामुळें तुम्हीं आपल्या सभोंवार नंदनवन, स्वर्ग व सुखाचा सागर निर्माण करूं शकतां; त्याचप्रमाणें अंधःकार, दुःख व दैन्य यांचे निर्मातेहि तुम्हींच आहांत. सुगंध आणि दुर्गंध यांना तुम्हींच आपल्या विचारांनीं व कृतीनें जन्म देतां.

विचारांची आणि तुमची अखंड सांगड घातली गेली आहे. जसे तुमचे विचार तसा तुमचा आचार व जसा तुमचा आचार तसे तुम्हीं बनणार!

अज्ञानी माणसाला हें समजत नाहीं. तो अज्ञानाच्या तावडींत सांपडून कुठें तरी कसा तरी भटकत असतो. विचारपूर्वक कोणतीहि गोष्ट करण्याची त्याला जरूरीच भासत नाहीं. ज्ञानी माणूस आपलें प्रत्येक पाऊल विचारपूर्वक टाकील. तो विचारानें वागेल व सन्मार्गानें जाईल. आणि तोच मुमुक्षुपदाचा मालक होऊं शकेल.

**विचारांचें सामर्थ्य**

तुमच्या मनांत जे विचार जागृत होतात व ज्यांच्यासंबंधानें तुम्हांला ओढ लागते त्याच गोष्टी तुमच्या सन्निध येतात; तुमच्या आटोक्यांत येतात. तुमच्या मनांत एखाद्याबद्दल प्रेमाचे विचार आले तर त्याचें प्रेम तुम्हांला लाभेल, आणि द्वेषाचे किंवा मत्सराचे आले तर त्याचा द्वेष व मत्सर तुमच्या वाट्यास येईल. विचार हे जागच्याजागीं विरून जाऊं शकत नाहींत. ते आपला प्रभाव दाखवितातच. तुम्हीं तुमच्या विचारामुळें मित्रत्व वा शत्रुत्व निर्माण करूं शकतां.

एखाद्याबद्दल प्रेमभावाचे, मित्रत्वाचे विचार तुमच्या मनांत आले तर ते त्याला तसेच तुम्हांला उपकारक होऊन रहात असतात; आणि याच्या उलट शत्रुत्वाचे विचार मनांत आले तर तुम्हीं उभयतांमध्यें शत्रुत्व निर्माण करूं शकतां. थोडक्यांत सांगायचें म्हणजे तुम्हीं आपल्या विचारांच्या, शब्दांच्या व कृतीच्या द्वारें समाजांत हितकारक किंवा अहितकारक वातावरण पसरवूं शकतां. यासाठीं अत्यंत सावधानतेनें वागलें पाहिजे. आपल्या अंतःकरणांत सदासर्वकाळ पवित्र विचारांनाच थारा द्यावयाचा. दुष्ट वासना हुसकावून लावावयाच्या; त्यांना केव्हांहि थारा द्यावयाचा नाहीं. अशा निर्धारानें तुम्हीं नेहमीं वागलें पाहिजे.

अनुभवी व सिद्ध पदाला पोहोंचलेल्यांचें असें साधार म्हणणें आहे कीं, आपल्या मनांत कोणतीहि अशुद्ध भावना किंवा विचार जागृत झाला असतां तिला तेथें दहा

मिनिटें जरी थारा मिळाला तरी आपल्या सूक्ष्म शरिरावरील तिची पकड कमीत कमी अठ्ठेचाळीस तास तरी रहात असते. यासाठीं आपल्या विचारांची दिशा वाटेल ती व भलतीसलती असूं नये. विचार सत्प्रवृत्त असावे. आपलें सुंदर भवितव्य बनविण्याचें तें साधन आहे. यासाठीं मनांत पापी, नष्ट, दुष्ट, अनुचित विचारांस केव्हांहि थारा देऊं नका. त्यांचें पळभरहि पोषण करूं नका. आपल्या विचारांवर नियंत्रण ठेवा. त्यांच्या आधीन होऊं नका. दुष्ट, स्वार्थी विचारांस अंतःकरणांत स्थान दिल्यास तुम्हीं कितीही प्रार्थना केली किंवा दानधर्म केला तरी त्याचे दुष्परिणाम तुमच्या वाट्यास आल्याशिवाय रहाणार नाहींत.

## इश्वर तुमचा पाठीरखा होईल

मनांत नेहमीं पवित्र, पुण्यशील विचारांस थारा द्यावयाचा व त्या विचारानुसार आचरण करावयाचें, हा मार्ग ज्यानें स्वीकारला त्याला मोक्ष दूर रहात नाहीं. सद्वृत्ती ही त्याच्यासाठींच असते. मग अदृश्य अशा दैवी शक्तीची जोड तुम्हांला अनायासें होत जाईल. ईश्वर तुमचा पाठीराखा होऊन राहील व तोच आपल्या हातीं धरून तुम्हांला सन्मार्गानें घेऊन जाईल.

हा सद्वृत्तीचा मार्ग ज्यानें पकडला त्या भक्ताच्या सहाय्याला भगवंत नेहमीं हजर असतो. तुमच्या विचारांत दया, करुणा, सहानुभूती यांचा आविष्कार ज्या प्रमाणांत वाढत जाईल त्या प्रमाणे तुमच्याकडून परोपकार घडत जाईल, तुमचा भक्तिभाव वाढत जाईल तस तसें भगवत् स्वरुप तुमच्या आटोक्यांत येत जाईल. एकदां कां हा मार्ग तुम्हीं घट्ट पकडला म्हणजे अनायासें तुम्हीं दैवी मार्गानें जाऊं लागाल. दुसरा मार्ग तुम्हांला रुचणार नाहीं. आस्ते आस्ते तुमचा स्वभाव, तुमची प्रकृती बदलत जाईल; तुमच्यामध्यें दैवी तेज मग आपोआप चमकूं लागेल. परंतु तत्पूर्वी तुमचें अंतःकरण सद्भावना, सद्गुण, सहानुभूति, करुणा यानीं भरून तें दुथडी वाहूं लागलें पाहिजे.

आमचा हा कारागृहवास आहे. तो आमचा आम्हींच निर्माण केलेला आहे. त्याच्या भिंती फोडून तोडून त्याच्या बाहेर पडणें न पडणें हें आमच्या हातीं आहे. ज्याची पूर्वपुण्याई सबळ, ज्याचें पूर्वसंचीत बलवान त्यालाच वरील मार्गानें जाऊन या भिंती फोडून तोडून टाकण्याचें साधेल, इतरांस साधणार नाहीं. त्यानीं मरेपर्यंत हा कारागृहवासच सहन करावा.

कोणीही मनुष्य असो. जो जो कोणी सद्भावनांची कांस धरून त्या मार्गानें जाण्यासाठीं निर्धारपूर्वक बद्धपरिकर होईल, तो स्वर्गसोपानाची उच्च पायरी गाठल्याशिवाय रहाणार नाहीं. जें करायचें तें सत्कृत्यच करावयाचें, जें बोलावयाचें तें चांगले व कल्याण-कारकच बोलावयाचें, जें लिहावयाचें तें सर्वांना मार्गदर्शक व सुफलदायक होईल असेंच लिहावयाचें, असा आपण दंडक घालून घेतला पाहिजे.

## जिभेवर बंधन

आपण आपल्या जिव्हेवर बंधन घातलें पाहिजे. फार कमीत कमी बोलायचें, शक्य तों मौनव्रताचें पालन करावयाचें. विचारपूर्वक, सत्य, प्रिय व रुचकर असेल तेंच जरूर पडल्यास बोलावयाचें. नाहीं तर बोलायचें नाहीं, असा नियम करून तो आपण आचरणांत झटून आणला पाहिजे. मग पहा त्याचा किती सुंदर परिणाम घडून येतो तो.

आपला मोकळा वेळ नेहमीं आत्मचिंतनांत घालवावा. हव्या कशाला दुसऱ्याच्या उठाठेवी ? ज्याचें तो पाहून घेईल ! आत्मचिंतन करूं लागलांम्हणजे तुमचा आस्ते आस्ते विकास होत जाईल. 'अंतर मम विकसीत कर हे परात्परा !' हीच आपली नित्याची प्रार्थना असावी. परंतु आत्मा विकसीत प्रफुल्लित व सुगंधीत केव्हां होईल ? तुम्हीं त्याचें चिंतन कराल, त्याच्याकडे लक्ष पुरवूं लागाल ,त्याच वेळीं.

हा मनुष्य जन्म तुमच्या वाट्याला आला आहे तो उगाच कसातरी घालविण्या-साठीं नाहीं. तुम्हीं याच जन्मीं देवत्व प्राप्त करून घ्यावयाचें आहे. तुम्हीं जों जों संसारांतील सुखोपभोगांचा मोह कमी कमी कराल तों तों परमानंदाचा मार्ग तुमच्या-जवळ अधिकाधिक येऊं लागेल. संसारासंबंधीं गोष्टी तुमच्या मनांतून जों जों कमी होत जातील तों तों ईश्वरी प्रेरणा तुमच्या जवळपास नांदूं लागेल. ती प्रेरणा संपादन करणें हेंच तर आपलें ध्येय असलें पाहिजे.

तुम्हीं ज्ञानी, विवेकी व डोळस होण्यासाठीं झटा. म्हणजे मग भगवंताचें स्वरूप पहाण्याचे तुम्हीं अधिकारी व्हाल. खरें सुख त्यांत आहे. तेंच आपलें ध्येय असलें पाहिजे. त्या ध्येयाप्रत जाण्याचा मार्ग यथाशक्ति दाखवून देण्यांत आला आहे. तो आचरणांत आणण्यासठीं झटा. तुमचें शाश्वत कल्याण त्यांतच सामावलेलें आहे हें निश्चित समजा.

---

ख्रिस्ती धर्माचें महान् प्रतीक म्हणजे 'क्रॉस' हेंच होय. त्या क्रॉसवर धर्मात्मा ख्राईस्टला लटकाविण्यांत आला. तेथें आधिभौतिक दृष्टीनें त्याला पराभव पत्करावा लागला; परंतु तोच त्याचा अध्यात्मिक विजय होता. त्याचप्रमाणें आम्हीं स्वीकारलेला मार्ग सत्याचा आहे अशी मनाची खात्री असल्यास आपणही हालअपेष्टांची व दुःखाची पर्वा न करतां त्याच मार्गानें गेलें पाहिजे.

— सर राधाकृष्णन्






*************** संकलक : **आमचे प्रतिनिधि** ***************

## दळणाची लीला

१९१६ साल्च्या मे महिन्यांत बाबांचे एक निःसीम भक्त शिरडीस बाबांच्या दर्शनासाठीं गेले होते. मशिदींत जातात तों त्यांना असें दिसलें कीं, बाबा इतर दोघां स्त्रियांबरोबर गहूं दळीत बसले आहेत ! त्यावेळीं झालेला संवाद या भक्तानें टांचून ठेवला होता. तो असा —

'बाबा ! मला जात्याला हात लावूं द्या ना !'

'आये ! तूं थकशील.'

'बाबा मला होईल तितकें मी आनंदानें दळीन.'

'बरें आये !' असें म्हणून जात्यावर बसलेल्या लक्ष्मीबाईस बाजूला होण्यास सांगून ते, जमालबाई व ही विनंती करणारी स्त्री अशीं दळायला बसलीं.

दळतां दळतां त्या स्त्रीनें विचारलें, 'बाबा, हे गहूं तुम्ही कां दळतां ?'

'आये, कधीं कधीं त्याच्या पिठाच्या भाकरी करून बाळगोपाळांना खाऊं घाला-वेसें वाटतें म्हणून.'

'पण बाबा, कधीं कधीं तें पीठ शिवेच्या ओढ्यावर नेऊन टाकवितां तें कां ?'

'आये, कधीं कधीं त्या आकाबाईचा फेरा इथें येत असतो. ती त्या ओढ्यावर बसून माझा लई काळावाला करते, कीं, मला गांवांत येऊं दे. तेव्हां तिला खाऊं घालावें लागतें ना ?'

'बाबा, ही जरीमरी दैवतें आहेत का ?'

'होय आये ! हीं हलकीं दैवतें आहेत. पण तीं आपल्याला कांहींबी करणार नाहींत.'

'मग जरीमरी गांवांत येऊन कांहीं माणसें वाख्यानें मरतात तें कसें ?'

'आये, ती मला लई शिया देती. तेव्हां मी देवालों पुसतुं, आणि त्याचा हुकूम घेऊन मोजकीं माणसें तिला नेण्याला सांगतों.'

'तर बाबा, भुतेंखेतें आहेत खरीं !'

‘ होय आये, आहेत तर, पण तीं आपल्या वाटेस जायचीं नाहींत. ’

‘ बाबा, आम्हीं नायगांवला राहात होतों तेथें एक पुरुष रोज तिनसांजचा विहिरीच्या बाजूकडून येऊन, पायऱ्या चढून एका खोलींत जात असे व तिथें नाहींसा होत असे. ’

‘ आये, त्याला मी ओळखतों ! तो त्या घरचा मालक होता ! आणि ज्या खोलींत तूं बाळंत झालीस त्याच खोलींत तो नाहींसा होत असे ना ! ’

‘ बाबा ? तुम्हांला कसें हो हें माहीत ! ’

‘ आये, तूं लहान होतीस तेव्हांपासून मी तुला ओळखतों. मध्यें तूं मला विसरली होतीस. मग तुला इकडे बुलावून आणली. अग, माझे बाळगोपाळ जरी कोसावर असले तरी मी त्यांना जवळ बोलावून आणीत असतों. माझी नजर सगळ्यावर सारखी आहे. आये ! खटनट, सुष्टदुष्ट सगळ्या तऱ्हेची माणसें आपल्या दरबारांत येतात. त्या सगळ्यावर मला सारखी नजर ठेवावी लागते ना ? ’

इतकें संभाषण होईतोंवर ती स्त्री थकली. हें पाहून बाबा म्हणाले, ‘आये, तूं आतां दमलीस. आतां या बाईला जात्याला हात लावूं दे. ’

तेव्हां ती दूर सरली आणि बाबा, जमालबाई व लक्ष्मीबाई अशा तिघांनीं भरभर जातें चालवून तासाभरांत सर्व गहूं दळले.

× × ×

## भक्ताची मनकामना पूर्ण केली

श्रीसाईबाबा समाधिस्थ होऊन आज बरींच वर्षें झालीं. पण अजूनहि वेळोवेळीं ते आपल्या भक्तांसाठीं धांवत येऊन त्यांचें संकट, मग तें कोणत्याहि प्रकारचें असो, दूर करतात. मात्र भक्तानें अनन्य भावानें त्यांना शरण गेलें पाहिजे.

मद्रास प्रांतांत वेन्ट्राप्रागडा म्हणून एक खेडेगांव आहे. (तालुका—गुडीवाडा—जिल्हा—कृष्णा) तेथें नागाभाईराव वेंकटरत्नम चौधरी नांवाचे एक तेलगू (कामा जातीचे) सुखवस्तू गृहस्थ राहतात. १९३७ सालांतील गोष्ट. त्यावेळेस हे गृहस्थ अत्यंत चिंतेंत होते. त्यांची बायको सुमारें वर्षभर खरजेसारख्या रोगानें (Eruption all over body) आजारी होती. सर्व उपचार झाले पण गुण येत नव्हता. त्यांच्या वडील भावाचा मुलगा ४ वर्षें कफक्षयानें (T. B.) आजारी होता. त्याचेकरतां सर्व वैद्यकीय व डॉक्टरी उपाय केले. पण दिवसेंदिवस त्याचा आजार वाढतच गेला. देवस्की, मंत्र, तंत्र इत्यादि सर्व उपाय झाले, पण गुण नाहीं. शेवटीं परमेश्वरावर सर्व भार टाकून ते स्वस्थ बसले. अशा रीतीनें ते परमेश्वरास अनन्यभावानें शरण गेल्यामुळें व त्याचेवर विसंबून राहिल्यामुळें परमेश्वरस्वरूप श्रीसाईबाबांस त्यांचे सहाय्यास धांवून जाणें भाग पडलें.

त्याच गांवांत श्री. रामराव या नांवाचे एक शाळामास्तर होते. ते आपणहून वरील गृहस्थांस भेटले व त्यांनीं नागाभाईरावांना श्रीसाईबाबांचा फोटो देऊन त्यांची पूजा करण्यास सांगितलें. फोटो पाहतांच श्री. नागभाईरावांचें मन एकदम प्रसन्न झालें व आपल्या शिरावरील एक मोठें दडपण दूर झाल्याचा भास झाला. श्रीसाईबाबा फोटोची ते त्रिकाल पूजा करूं लागले. श्री. ए. रामराव ह्यांनीं नागभाईरावांना 'बाबांची उदी' दिलीच होती. ते रोज आपल्या पुतण्यास ती देऊं लागले. तसेच ते 'श्रीसाईबाबा' 'श्रीसाईबाबा' हें नांव एकसारखे कागदावर लिहूं लागले. श्री. ए. रामराव यांनी दिलेली उदी संपल्याबर ते ती श्रीसाईबाबा शिरडी संस्थानचे सरकारकून यांचेकडे मागवून घेऊं लागले. थोड्याच दिवसांत त्यांची बायको तर पूर्ण बरी झालीच पण अवघ्या सहा महिन्यांत त्यांचा पुतण्या जो क्षयरोगानें मरणाच्या दारीं पडला होता तोही खडबडीत बरा झाला.

आतां श्री. नागाभाईरावांना शिर्डीस जाऊन श्रीसाईबाबांच्या समाधीचें दर्शन घेण्याची तीव्र इच्छा उत्पन्न झाली. त्यांना सन १९३७ सालापर्यंत मूल नव्हतें. व ह्या वेळेस त्यांचे लग्नास २०।२२ वर्षें होऊन गेली होती. तेव्हां आपली हिही इच्छा 'बाबा' पूर्ण करतील ह्याची त्यांना खात्री वाटूं लागली. पण कांहींना कांहीं अडचणी येत जाऊन त्यांचे शिरडीस जाणें लांबणीवर पडलें. शेवटीं तो योग १९४१ मध्यें आला. त्या वेळेस (जानेवारी १९४१) ते सहकुटुंब शिर्डीस आले. कोपरगांवीं स्टेशनवर ते रात्रींच उतरले; पण शिर्डीस जाण्यास मोटार नसल्यामुळें ते स्टेशनवरच झोंपले. त्या रात्रीं त्यांना स्वप्न पडलें व स्वप्नांत त्यांनीं श्रीसाईबाबांची समाधी पाहिली. हा एक शुभशकुनच होय असें त्यांना वाटलें. नंतर ते शिर्डीस आले. संध्याकाळीं श्रीसाईबाबा ज्या निंबवृक्षाखालीं बसत असत त्या वृक्षाची थोडीशीं पानें प्रसाद म्हणून घेण्याकरतां तोडीत असतां एका मधमाशीनें त्यांचे बोटावर डंख मारून चावा घेतला. तेव्हां त्यांस फार वेदना होऊं लागल्या. त्यावेळीं अखिल भारतीय श्रीसाईसमाजाचे अध्यक्ष श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी हे तेथेंच होते. त्यांनीं लगेच आपले जवळची श्रींची उदी नागभाईरावांचे बोटास लाविली व म्हणाले कीं, मि. नागभाईराव, आतां तुमच्या सर्व पापांचा क्षय झाला. तुमची इच्छा पूर्ण होईल. नागभाईराव लगेच पुन्हां समाधी मंदिरांत गेले व समाधीचें दर्शन घेऊन आपणांस मूल व्हावें (मग तो मुलगा असो वा मुलगी असो) अशी श्रींचे चरणांजवळ प्रार्थना केली.

त्याच रात्रीं ते धर्मशाळेंतील आपल्या खोलींत झोपले असतां त्यांना एक स्वप्न पडलें. स्वप्नांत त्यांना एका ब्राह्मणानें मूल दिल्याचें व त्या मुलानें त्याचे अंगावर लघवी केल्याचें दृश्य पाहिलें. दुसरे दिवशीं संध्याकाळीं ते आपल्या घरीं गेले.

अनन्यभावानें शरण आलेल्या भक्तांच्या मनकामना पुरविणें हें तर श्रीसाईबाबांचे ब्रीदच आहे. घरीं परत जातांच सुमारें १ महिन्यांतच, घरांत मूल खेळूं लागेल अशी चिन्हें दिसूं लागलीं, व यथायोग्य काळीं त्यांचं कुटुंब प्रसूत होऊन त्यांस कन्यारत्नाची

प्राप्ती झाली ( ता. १६–९–१९४१ ). श्रीसाईबाबांच्यान्न कृपेचा हा प्रसाद होय म्हणून मुलीचें नांव 'श्रीसाई वर प्रसादिनी' असें ठेवलें. श्रीसाईसगुणोपासना, स्तवनमंजिरी वगैरे पुस्तकांचें तेलगूंत भाषांतर करून श्रीसाईबाबांचा प्रचार त्या बाजूस त्यांनीं बराच केला आहे. शिवाय श्रीसाईबाबांचें एक मंदिरही त्यांनी आपल्या वेन्ट्राप्रागडा गांवीं बांधलें आहे.

× × ×

**श्रद्धेचें फळ मिळालें**

श्री. सीताराम हरी कुळकर्णी ( कळमकर ) या नांवाचे एक गृहस्थ पुणें जिल्ह्यांतील चांदोली ह्या खेडेगांवांत ( पोष्ट—कळंब, तालुका—आंबेगांव ) राहतात. हे पेन्शनर शिक्षक [ मराठी ] असून गेलीं सात वर्षें नियमानें शिरडीस गुरुपौर्णिमेच्या उत्सवास जातात. १५ वर्षांपूर्वी ह्या गृहस्थांस श्रीसाईबाबाबद्दल माहिती नव्हती.

खेडेगांवांत साधारण प्रत्येकाची शेतजमीन असते. त्याप्रमाणें तशी ह्याही गृहस्थांची होती. शेतांत बटाटे पिकऊन ते सरकारास विकत असत. त्यावर्षी ( म्हणजे सन. १९४५ सालीं ) ह्यांच्या शेतांतील बटाट्यास कीड लागून ते खराब झाले. त्यामुळें हे बटाटे सरकारांत कसे विकले जातील याची त्यांना सारखी चिंता वाटूं लागली. बटाटे पिकाविण्यास व इतर त्याबाबतचा खर्च म्हणून त्यांस ४०० रु. लागले पण व्यापारी बटाट्यांची किंमत २०० रु. पेक्षां जास्त देईनात. त्यामुळें उलट मुदलांतच २०० रुपये तोटा येण्याचें भय उत्पन्न झालें ने निराश झाले व सरकारांत बटाटे विकण्याचा प्रयत्न करण्याचें धैर्य त्यांस झालें नाहीं.

अशा स्थितींत त्याच गांवांत श्री. कदम या नांवाचे एक शिपाई रहात असत. त्यांनीं आपणहून वरील गृहस्थांना श्रीसाईबाबांचा फोटो आणून दिला व सांगितलें कीं, 'बाबांवर' संकट घालून त्यांचेवर दृढ श्रद्धा ठेवल्यास सर्व ठीक होईल. फोटो पाहतांच श्री. कुळकर्णी ह्यांचें मन बरेंच शांत झालें. ते श्रीसाईबाबांच्या फोटोची त्रिकाल पूजा अत्यंत भक्तियुक्त अंतःकरणानें करूं लागले व जर हें संकट निवारलें गेलें तर शिर्डीची दर गुरुपौर्णिमेस वारी करूं असा नवस केला.

आणि आठ दिवसांनीं एकाएकी कांहींतरी प्रेरणा झाल्यामुळें म्हणा, त्यांस असें वाटलें कीं, आपला माल सरकारांत नक्कीच खपला जाईल आतां त्याचा माल जास्तच खराब झाला होता. तरी तसाच तो माल त्यांनीं सरकारांत दाखल केला आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, कांहींही हरकत, त्रास किंवा पैशाची मागणी ( लांच वगैरे ) न होतां सरकारी अधिकाऱ्यानें त्यांचा माल नं. १ च्या प्रतीचा माल म्हणून पास केला व त्या भावानें त्यांस पैसे दिले. ते ६०० रु. मिळाले. म्हणजे जेथें २०० रु. नुकसान येत होतें ते श्रीसाईबाबांच्या कृपेनें २०० रु. फायदा झाला तेथपासून ते 'बाबांचे'. एक निःसीम भक्त

बनले व आज गेलीं सात वर्षे ते नियमानें श्रीक्षेत्र शिरडी येथें दर गुरुपौर्णिमा उत्सवास येतात.

× × ×

## मी बचावलों

'सुमारें बारा वर्षांपूर्वीची गोष्ट ऐन दुपारची वेळ. बारा वाजण्याचा सुमार. मे महिन्यांतील-उन्हाळा. ऊन मी म्हणत होतें. अशा वेळीं मी मंचरच्या बाजाराहून पायींच घरीं परत येत होतों.' असें म्हणत वरील गृहस्थांनीं (श्री. सीताराम हरी कुळकर्णी) आपला दुसरा अनुभव सांगितला. श्री. सीतारामपंत बोलत असतांना त्यांचें अंतःकरण अगदीं भारावून गेल्यासारखे झालें होतें (व ते वारंवार बाबांच्या समाधीकडे [शिर्डी येथील] लेखकास माहिती सांगत होते.) बाबांनीं त्यांना ज्या संकटांतून सोडविलें तें संकटही तसेंच कांहींतरी जबरदस्त असावें अशी माझी खात्री झाली. जणुं कांहीं तो प्रसंग आतांच आपल्या डोळ्यासमोर घडत आहे असें त्यांना सारखें वाटे. ते पुढें म्हणाले, 'मंचरपासून १ मैलावर एका ओढ्याचे कांठीं, सडकेपासून सुमारें १ फर्लांगभर अंतरावर, लघुशंका करण्याकरतां म्हणून सडकेकडे पाठ करून बसलों. इतक्यांत एक नव्या चार बैलांची गाडी, जी मंचरहून खेडला जात होती. ती रस्ता सोडून माझे अंगावर धांवून आली. मला ह्याची कांहींच कल्पना नव्हती कारण माझी पाठ सडकेकडे होती. गाडी माझे अंगावर चालून येत आहे असें पाहातांच आजुबाजूचे लोक ओरडले कीं अरेरे म्हातारा! (श्री कुळकर्णी) मेला. लोकांचें ओरडणें ऐकून व बैलगाडीचा आवाज ऐकून मी मागें वळून पांहतों तों बैलगाडी अवघ्या चार हातावर आली होती. उठून पलिकडे सरकण्यास सुद्धां अवकाश नव्हता. मी एकदम घाबरून गेलों व डोळ्या-पुढें अंधेरी आली. मरण अगदी स्पष्ट दिसूं लागलें. अशा स्थितींत "बाबा तुम्हीच मला तारणार" असें म्हणत नमस्कार करण्याकरतां म्हणून मान खाली वांकविली तोंच गाडी डोक्यावरून एकदम पुढें निघून गेली. हें सांगण्यास जेवढा वेळ लागला त्याच्या निमिषार्धांत हा सर्व प्रकार घडला. मी जर मान वांकविली नसली तर गाडीच्या दोन चांकामध्यें जो आंस असतो त्याजवर डोके आपटून त्याच्या चिंधड्या झाल्या असत्या पण गाडीच्या चाकांचा जो धक्का लागला त्यावरच निभावलें. कोणतीही जखम झाली नाहीं. श्री बाबापुढें नम्र झाल्यामुळेंच जीवदान मिळालें. बाबाची कृपा!

× × ×

## माझी श्रद्धा बळावली

**डॉ. कु. गु. मालवणकर मेहसाणा** ह्या आपला अनुभव कळवितात कीं, मी एक सरकारी नोकर आहें. आपल्याला माहीतच असेल कीं सरकारी कायद्याप्रमाणें प्रत्येक सरकारी नोकराला हिंदुस्थानीच्या चार परीक्षा पास करण्याचा हुकूम निघाला होता. त्याप्रमाणें यंदां मी तिसऱ्या परीक्षेस बसलें होतें. मला सोळा आणे खात्री होती कीं, मी चांगल्या तऱ्हेनें पास होणार. ता. ९-६-५२ रोजीं सकाळीं ११ वाजण्याच्या

सुमारास दैनिक आला. आमच्या येथील एक कंपाऊंडरहि तिसऱ्या परीक्षेस बसला आहे. तो सांगत आला, 'बाईसाहेब आपला नंबर नाहीं व माझा नंबर आहे.' मी चाट पडलें. मला पेशन्ट तपासणें सुचेना. जेमतेम काम आटोपून घरीं आलें. थोडासा राग स्वयंपाकिणीवरहि काढला. कांहीं वेळानें कंपाऊंडरची बायको सांगत आली कीं, आपण आपला नंबर व नांव रिझल्ट आला असेल तिथें पाठवून खात्री करून घ्यावी. मी मनांतून तिच्यावर संतापलें कीं हिचा नवरा पास झाला म्हणून माझी फजिती उडवायला आली. तिला तुसडें उत्तर दिलें कीं, मी नापास झालेली आहे व नंबर पाठवून आणखी वाजवी फजिती करून घेऊं इच्छित नाहीं. ती माझ्या रागाचा पारा पाहून तशीच मागल्या पावलीं निघून गेली.

मला करमेना. मी बिछान्यावर लवंडलें. जरा डोळा लागला. थोड्या वेळानें जाग आली. माझी नजर श्रीसाईबाबांच्या फोटोवर गेली. मला आठवण झाली कीं आज आपण हिंदुस्थानीच्या क्षुल्लक परीक्षेत नापास झालोय. एकाएकीं एक विचार मनाला चाटून गेला. मी नेहमी साईबाबांना चिठ्ठी टाकून त्यांच्या सम्मत्तीनें कुठलेंही काम करतें. आपण नापास होणें शक्य नाहीं. असें माझें मन ग्वाही देत होतें तर त्याचा सोक्षमोक्ष चिठ्ठी टाकून करण्यांत काय बिघडतें म्हणून मी चिठ्या टाकल्या. त्यांत पास चिठ्ठी आली. माझ्या मनाची काय स्थिति झाली असेल म्हणून सांगूं? एका बाजूला वाटे साईबाबांची चिठ्ठी खोटी ठरणें शक्य नाहीं. दुसऱ्या बाजूला मनुष्यस्वभावाप्रमाणें शंका माझें मन घेरून राहिली होती. मी बेचैन आलें. विचार केला कीं, आतां नंबर पाठवून लवकरच निर्णय करून घ्यावा. असा विचार करते ना करतें तोंच वरील उल्लेख केलेला कंपाउंडर सांगत आला कीं, मी आपला रिझल्ट आणला. आपण सेकंड क्लासमध्यें पास झाल्यांत.

आज माझा साईबाबांवरील विश्वास शंभर पटीनें वाढला आहे. असे लहान मोठे अनेक अनुभव मला आलेले आहेत. परंतु आळसानें किंवा वेळ नसल्यामुळें पाठविणें शक्य होत नाहीं.

वाचकांना माझी एवढीच विनंति आहे कीं, तुम्हीं विश्वास ठेवण्यांत जराहि डगमगूं नका. तुमचीं संकटें श्रीसाईवरील विश्वासानें खात्रीनें दूर होतील.

× × ×

**श्री. रा. स. नाईक**, मराठा समाजगृह, परळ हे आपल्या अनुभवासंबंधीं लिहितात कीं, माझ्या शिरडीच्या ता. २७–१०–१९५१ च्या तिसऱ्या भेटीचे अनुभव. मी व श्री. आनंद पाताडे शनिवार ता. २७–१०–५१ रोजीं रात्रीच्या गाडीनें निघून रविवार ता. २८–१०–५१ रोजीं सकाळीं शिरडीस पोहोंचलों. पूर्वीच्या व या वेळच्या भेटींतील फरक म्हणजे, यावेळीं भावना उचंबळून येत व मी प्रत्यक्ष बाबांच्या पुढें उभा असून बाबांना माझीं सुखदुःखें सांगत आहे असें वाटत होतें व माझी फारा दिवसांची अशी भावना होती कीं, बाबा ज्या दिवशीं माझ्याकडे पाहून हंसतील त्या दिवसापासून

माझ्या जीवनामध्यें फरक होईल. त्याप्रमाणें मी शिरडींत गेल्यापासून तिन्हीं ठिकाणीं जप करण्यास (समाधी, मशीद व गुरुपादुका) बसल्यावेळीं बाबा माझ्याकडे हास्य मुद्रेनें पहात आहेत असा भास होऊं लागला.

सोमवार ता. २९–१०–१९५१ रोजीं सकाळीं आठ वाजतां मी गुरुपादुकांजवळ जप करीत असतां, मला बाबांच्या मशिदींतील व गुरुपादुकांजवळील भिक्षेच्या वेळच्या मिरवणुकींतील व लेंडीबागेंतील अशा बाबांच्या सर्व फोटोंचें दर्शन झालें. पुढें ता. ३०–१०–१९५१ रोजीं श्री. आनंद पाताडे यांनीं, 'उद्यां आपण निघूं या' असें सांगितलें त्यावेळपासून माझ्या मनाला हुरहुर लागली व आपण आलों तें काम पुरें न करतांच जाणार असें वाटूं लागलें. नंतर संध्याकाळीं आनंद पाताडे यांनीं 'उद्यां राहूं' असें सांगताक्षणींच मनाचें समाधान झालें व आम्हीं व श्री. गडकरी असें मिळून मशिदीमध्यें जाऊन, जप कोणता म्हणावा याबद्दल एकमेकांस विचारूं लागलों. परंतु कोणालाच अमुक जप असें सांगतां येइना. त्यापूर्वी आम्हीं 'साईराम' 'साईनाथ' असें म्हणत असूं.

नंतर आम्हीं झोंपी गेलों व दृष्टांतामध्यें मी व श्री. पाताडे मशिदींत गेलों त्या ठिकाणीं पुष्कळ लोक होते. त्यांच्यामधून एकजण जप कोणता म्हणावा असें मला विचारूं लागला; त्यावर मी म्हटलें कोणाला तरी विचारलें पाहिजे. इतक्यांत तोच गृहस्थ म्हणाला, मशिदीच्या बाहेर खाटेवर एक म्हातारा बसला आहे त्याला आपण विचारूं; असें म्हणून आम्हीं जवळ गेलों व मी म्हटलें हे तर आमचे बाबा; आणि बाबांना म्हटलें, 'बाबा, जप कोणता म्हणावा' त्यावर बाबा म्हणाले, 'श्रीसाईनाथ समर्थ' असें म्हणा.

नंतर ता. ३१–१०–१९५१ रोजीं संध्याकाळीं ५ वाजतां मी व आनंद पाताडे जप करीत असतां (डोळे मिटून) एका झाडाला वेलींचा झुला बांधला असून त्यावर जाईच्या वेलींची कमान आहे व त्यावर बाबा बसले आहेत व हंसत मुखानें झोके घेत आहेत असें दृश्य दिसलें. इतक्यांत श्री. आनंद पाताडे यांनीं मला जाण्यासाठीं हांक मारली परंतु माझेच डोळे उघडेनात. (श्रीकृष्णाच्या 'झुलाविहार' या नांवाच्या फोटोंत दाखवितात त्याप्रमाणें).

---

यशाबरोबर अधिकार प्राप्त होऊन नीतिभ्रष्टता आली कीं अपयशाची गांठ पडून, नाश झालाच म्हणून समजावें.

—महात्मा गांधी



# संत बाबा महाराज यांचें चरित्र

ह. भ. प. संत हरी रामचंद्र कुवल ऊर्फ बाबा महाराज यांचें हें अल्प चरित्र त्यांचे एक शिष्य श्री. रघुनाथ पुंडलीक खराडे यांनीं भक्तिभावपूर्वक लिहून प्रसिद्ध केलें आहे. या संताचा जन्म कोंकणांत कोळंब (मालवण) या गांवी झाला. त्यांचें शिक्षण मराठी दोन तीन इयत्ता पलिकडे झालें नाहीं; परंतु अंतःकरणांत देवभक्तीचा उदय बालपणापासून झाला. पोटासाठीं उद्योग करणें प्राप्त झालें तेव्हां एका गलबतावर खलाशी या नात्यानें राहिले. कराचींत नोकरी निमित्त बरींच वर्षे त्यांचा मुक्काम होता. त्यानीं संसारांत पदार्पण करून तो जेमतेम दहा वर्षे म्हणजे पत्नीच्या निधनापर्यंत आदर्श रीतीनें चालविला. भारताचे दोन विभाग झाले त्यानंतर १९४८ सालीं आपल्या गावीं आले. बाबा १९४९ सालीं परत मुंबईस येऊन पोर्टट्रस्टमध्यें नोकरीस राहिले. त्यांचा सत्संग, वाचन, निदिध्यास चालूच होता. चार समविचारी मंडळी जमवून प्रवचन, विवरण करावयाचें व कांहीं तास ईशचिंतनांत घालवावयाचे या सत्संगाची गोडी उत्तरोत्तर वाढत गेली. तत्संबंधीं आवडी अनेकांच्या अंतःकरणांत निर्माण झाली. आणि असा हा सत्संगाचा प्रपंच बाबा गावोगांवीं जाऊन थाटीत आहेत व अनेकांस ईशचिंतनाकडे व देशभक्तीकडे वळवीत आहेत.

## बाबांच्या शिकवणीचें सार

सत्संगास येणाऱ्या मंडळींना बाबा नेहमीं पुढें लिहिल्याप्रमाणें उपदेश करीत असतात. सत्संग कां केला पाहिजे ? व त्याची जरूरी काय ?

**हरिती संत तमातें, संतत मातें तदीय संगातें ।**
**दे देवा, प्रिय करि ती, सत्संगति जें करी, न गंगा तें ॥**

वरील कवितेंत संतमूर्ति जड व मूढ मनुष्यांना कशाचा लाभ करून देतात व सत्संगामुळें कशाची प्राप्ति होते याविषयीं कवीनें स्पष्टपणें विशद करून सांगितलें आहे. तें असें कीं, संतांना मनोभावानें शरण गेल्यावर, प्रथम ते शरण जाणाऱ्या व्यक्तीच्या मनांतील अज्ञान नाहींसे करतात व जगामध्ये परमेश्वर कशा रीतीने भरला आहे व तो आपल्याजवळ कसा आहे याची ओळख करून देतात. यापुढचा मार्ग म्हणजे परमेश्वराचा अनुभव होण्यासाठीं वारंवार ते सत्संग घडवून आणतात, व आपल्या शिष्यमंडळींना उपदेशद्वारा परमार्थमार्गाला लावतात. त्याचप्रमाणें हजारों वेळां गंगामातेचें (तीर्थाचें) स्नान करून जें सांपडत नाहीं, तें थोड्याशा सत्संगानें सहज प्राप्त होतें. श्री समर्थ रामदास स्वामींनीं सुद्धां आपल्या एका ओवींत लिहिलें आहे कीं

**जे वस्तु परम दुर्लभ, जियेचा अलभ्य लाभ।**
**तेचि होय सुलभ, सत्संगे करोनी ॥**

हें संतांचें तत्त्व बाबांच्या अंतःकरणांत पूर्णपणें बाणलें आहे. म्हणूनच ते जेथें जेथें जातात तेथें तेथें सत्संग घडऊन आणतात. अशा रीतीनें बाबा स्वतः सत्संगप्रेमी बनले व ते आपल्या शिष्यमंडळींना सत्संगप्रेमी होण्याचा नित्य उपदेश करीत असतात.

**जैसें प्राणियांचें चित्त, विषयीं गुंते अहोरात**
**तैसें शिवनामीं जरी लागत, तरी मग बंधन कैंचें ॥**

बाबांचा नेहमींचा उपदेश असा कीं, आम्ही सर्व प्राणिमात्र कर्मभोगांच्या दोरांनीं घट्ट बांधलेले असून, या मायेच्या चक्रामध्यें कायमचे फसलेले आहोंत. याचें कारण काय म्हणाल तर आमचें मन, इंद्रियें व बुद्धि हीं सर्व मनोभावानें विषयांच्या ठिकाणीं रात्रंदिवस रत झालेलीं आहेत. तीच जर एकनिष्ठ भावानें परमेश्वराच्या नामस्मरणीं रत झालीं, तर मग आपण ह्या मायेच्या बंधनांतून सुटून भवनदीच्या पार उतरून जाण्यास आपल्याला वेळ लागणार नाहीं.

**शास्त्राभ्यास नको श्रुती पढुं नको तीर्थासि जाऊं नको,**
**योगाभ्यास नको व्रतें मख नको तीव्र तपें तीं नको ।**
**काळाचें भय मानसीं धरूं नको दुष्टांसि शंकूं नको,**
**ज्याचीया स्मरणें पतीत तरती तो शंभु सोडूं नको ॥**

ज्याला परमार्थमार्गाचा अवलंब करावयाचा आहे नव्हे साधावयाचा आहे त्यानें शास्त्रांचा अभ्यास किंवा वेदांचें पठण करण्याची जरूरी नाहीं. त्याचप्रमाणें तीर्थें, तपें, उग्रव्रतें, यज्ञ व योगाचा अभ्यास करावयास नको. या सर्व साधनांनीं परमेश्वर प्राप्ती तर होत नाहींच; उलट अभिमान मात्र वाढतो, व परमार्थ दूर राहातो. बाबा नेहमीं सांगत असतात कीं, हे सर्व मार्ग मी करून चुकलों आहे, व त्यांत कांहीं अर्थ नाहीं. अर्थ करणारे बिचारे भले करोत, आम्हांला त्यांच्या आड येण्याचें

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :-DIVYANETRA

**शिसा ऑप्टिशिअन्स** (BOM DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें डोळ्यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

**छबीलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८.**

# संत तिरुवल्लुवर याचीं बोधवचनें

संग्राहक : आर. व्ही. कामत

**दक्षिणेंत संत तिरुवल्लुवर यांचे महात्म्य फार मोठें आहे. ते एक सत्पुरुष होऊन गेले. त्यांनीं वेळोवेळीं प्रगट केलेल्या सुविचारांपैकीं नमुन्यादाखल पुढें कांहीं सुविचार देण्यांत येत आहेत.**

राज्यकर्ता जर योग्य प्रकारें शिक्षा करणारा नसेल तर त्याच्या राज्यांतील गरीब गाई सुद्धां दूध द्यायचे सोडतील. आणि ब्राह्मण आपलें आचरण विसरून जातील.

निरुद्योगी माणसाचा दानशूरपणा भेकडाच्या हातांतील तलवारीप्रमाणें निरुपयोगी ठरेल.

दैवानुसार न होणारें काम उद्योगी मनुष्य स्वत:च्या परिश्रमानें साध्य करून घेईल.

संकटाचे सुस्वागत करा ! संकटाला तोंड देऊन त्यावर विजय मिळविणे हाच त्यावरील योग्य उपाय !

---

कांहींच प्रयोजन नाहीं. तसेंच जगांत आपले कोणी शत्रु आहेत असा नुसता संशय सुद्धां मनांत आणूं नका; कारण आम्ही सर्व जीवमात्र मग तो मनुष्य असो, पक्षी असो अगर जीवजंतु असो, त्या एका परमेश्वराचे अंश आहोंत. तो परमेश्वर अपार समुद्र आहे व आम्ही सर्व त्या समुद्रावरच्या लहरी आहोंत. जसे आपण त्याच्यापासून निघून निराळे झालों, तसेंच शेवटीं त्याच्यामध्यें मिळून जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तो मार्ग म्हणजे त्याचें नामस्मरण हें होय. आजपर्यंत असंख्य साधुसंत नामस्मरणानें या भवनदींतून पार तरून गेले, त्याचप्रमाणें आपणांस तरून जावयाचें आहे. म्हणून माझें तुम्हांला हेंच सांगणें आहे कीं, त्या परमेश्वराचें अहोरात्र नामस्मरण करीत रहा, तें विसरूं नका. हा देह जिवंत असेपर्यंत जें कांहीं साधन करावयाचें असेल तें करून घ्या. हा देह पडल्यानंतर मग कांहींच करतां येणार नाहीं.

अशा या संताचें व त्यांच्या कामगिरीचें थोडक्यांत चरित्र लिहून श्री. र. पु. खराडे यांनीं आधुनिक संत वाङ्मयांत उपयुक्त भर घातली आहे, याबद्दल त्यांस धन्यवाद.

जो कोणी दुःखांतहि सुख मानील त्याची शत्रूदेखील वाखाणणी करील.

निर्भयता, बुद्धिमत्ता, वीरता, सद्विवेक आणि उद्योगशीलता ज्याच्यामध्यें आढळेल तोच मंत्री समजला जाईल.

स्वाभाविक विवेक, सौंदर्य आणि सुविद्या हे तीन गुण ज्याच्यामध्यें आहेत तोच राजदूत होण्यास योग्य.

राजदूताचें बोलणें अशा प्रकारचें असावें कीं, ऐकणारे मुग्ध होतील आणि ज्यांनीं ऐकलें नाहीं ते ऐकण्यास आतुर होतील.

मोजून मापून बोलण्याचें कसब ज्यांच्यामध्यें नाहीं तेच लांब लांब गप्पा मारतात.

ज्या राज्यांत अन्न धान्य विपूल आहे, सुविचारी आणि योग्य अशी प्रजा आहे, उत्साही धनवान असतील तेंच योग्य राज्य होय.

सर्व समृद्ध राज्याचा राजा जर कार्यदक्ष नसेल तर साऱ्या चांगल्या गोष्टींवर पाणी पडेल.

दयेची जननी प्रेम असली तरी संपन्नता हीच तिची पालनकर्ती आहे.

राज्यामध्यें संपत्तीचें वर्धन करणें हेंच योग्य आहे कारण शत्रूंचा गर्वहरण करण्याचें पोलादी अस्त्र त्याच्याशिवाय दुसरें कोणतेंच नाहीं.

साऱ्या जिवांचा जन्म एकच असला तरी त्यांची उच्च नीचता पूर्व कर्मांप्रमाणें वेगवेगळी होते.

आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या लोकांपासून हार मानण्याची विशालता हीच सौजन्याची कसोटी होय.

सर्वांच्या बरोबर प्रेमानें व्यवहार करणें हेंच संस्कृतीचें मूळ आहे.

जो दुसऱ्या बरोबर प्रेमानें मिळून मिसळून राहूं शकत नाहीं, त्याच्या बाबतींत उजाळा दिवस सुद्धां काळ्या रात्री प्रमाणें असतो.



५८१

# माझी श्रद्धा

**************

—राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद

माझीच नव्हे तर सर्व धर्मांच्या खऱ्याखुऱ्या अनुयायांची अशी श्रद्धा होती व आहे कीं, या जगांत अध्यात्मिक शक्ति म्हणून एक महान् शक्ति वावरत आहे !

त्या अध्यात्मिक शक्तीला वाटल्यास आपण ब्रह्म म्हणूं या. ती सर्वांहून श्रेष्ठ आहे. आम्हीं सर्व माणसें त्या शक्तीची लेकरें आहोंत. आणि म्हणून आम्हीं सर्वांनीं एकमेकांशीं प्रेमभावानें व बंधूभगिनींच्या नात्यानें वागणें हें आपलें कर्तव्य समजलें पाहिजे, त्यांतच आमचें कल्याण आहे.

कोणताही धर्म घ्या, त्या धर्मांत या तत्वाचा अंतर्भाव झालेला आहे. एकमेकांवर प्रेम करणें व एकमेकांशीं बंधूभावानें वागणें हे सर्व धर्मांचें सर्वसामान्य तत्व आहे. मग देवाची आराधना करण्याचे आमचे म्हणजे प्रत्येक धर्मांचे मार्ग व पद्धती भिन्न असल्या तरी आम्हीं एकमेकांबद्दल सहानुभूती व सहिष्णुता बाळगून एकमेकांशीं बंधूभावानें कां बरें वागूं नये ?

आमच्या भारतांत आमच्या पूर्वाचार्यांनीं–ऋषीमुनींनीं हें महान् तत्व ओळखलें होतें. त्यानीं आपल्या व सर्व काळांतील लोकांसाठीं नमुद करून ठेविलें आहे कीं, सर्व जगाला व्यापून राहिलेलें सत्य ब्रह्म एकमेव आहे, त्याच्या पर्यंत जाण्याचे प्रत्येक धर्मांचे मार्ग मात्र भिन्न असूं शकतील.

हें निर्विवाद सत्य आहे. चित्शक्ति एक आहे. ती सर्वांना व्यापून राहिलेली आहे व आम्हीं सर्वजण तिचीं लेकरें आहोत. तेव्हां आम्हीं एकमेकांशीं बंधूभावानें वागणें हाच आमचा धर्म आहे. ही आपली केवळ श्रद्धा असून भागणार नाहीं. तर ती आमच्या आचरणांत संपूर्णपणें उतरली पाहिजे क्षणोक्षणीं ही शिकवण आमच्या आचरणांत आली पाहिजे.

हें तत्त्व आमच्या आचरणांत जोपर्यंत येणार नाहीं तोंपर्यंत आम्हीं उंचावणार नाहीं. आम्हांला खरीखुरी वैभवश्री प्राप्त होणार नाहीं.

अनादि कालापासून भारत ही शिकवण देत आला आहे. ती आचरणांत कशी येईल यांचा विचार आमचे तत्ववेत्ते करीत आहेत. हें सर्व खरें असलें तरी या शिकवणीचा अंमल सध्यांच्या काळांत तर अवश्यमेव झालाच पाहिजे. सध्यांच्या काळांत कां? कारण आम्हीं आतां स्वतंत्र झालों असून, आम्हांला अंतर्गत असे मोठमोठे प्रश्न यशस्वी रीतीनें सोडवावयाचे आहेत. ते परस्परांत प्रेमभाव व बंधुभाव निर्माण झाल्याशिवाय सुटणें शक्य नाहीं.

---

शिखांच्या आदि ग्रंथांतील—



# संत नामदेवाची अमृतवाणी

*******************************

अनुवादक : **गणेश विष्णू कविटकर**, एम्. ए.

: १ :

देवा ! तुम्हीं दगड तारलेत, मग रामनामाचा जप करणारे लोक कां तरून जाणार नाहींत? गणिका, कुरूप कुब्जा, व्याध, अजामिळ यांना तुम्हीं तारलेंत. पायावर शरसंधान करणारासुद्धां मुक्त केलात, जे रामनाम घेतात त्यांच्यावरून मी माझी काया ओंवाळून टाकतों. दासीपुत्र विदुर, सुदामा यांनाहि तुम्हीं तारलेत, उग्रसेनाला राज्यपद दिलें. जपहीन, तपहीन, कुलहीन, आचारहीन अशा लोकांना सुद्धां नामदेवाच्या स्वामीनें तारून नेलें, मग मला कां बरें तारणार नाहीं ?

: २ :

ईश्वर एक असून तो सर्वव्यापी व पूरक आहे. जेथें पाहावें तेथें तो आहे. पण चित्र विचित्र मायेनें मोहित झाल्याकारनें ही गोष्ट थोडेच जाणतात. सर्व ठिकाणीं गोविंद आहे. गोविंदाशिवाय जगांत दुसरें कांहीं नाहीं. एकच सूत्र असून त्यांत हजारो मणी ओवावे तसा प्रभु सर्वत्र ओतप्रोत भरलेला आहे. पाण्यावरील तरंग, फेस व बुडबुडे हे पाण्याहून भिन्न नाहींत. संसार ही परब्रह्माची लीला आहे. विचार केल्यास ही लीला परब्रह्माहून वेगळी नाहीं. खोटा भ्रम आणि स्वप्नवत् मनोरथ या सत्य वस्तु असें मी समजलों; परंतु सुकृतामुळें प्राप्त झालेल्या गुरूपदेशानें मनाला जागृति आली. नामदेव म्हणतात, हरीची सृष्टिरचना पहा आणि मनांत विचार करा. प्रत्येक वस्तूमध्यें एकच मुरारी निरंतर वास करीत आहे.

: ३ :

विठ्ठलाची पूजा करावी म्हणून कुंभ आणून पाण्यानें भरले व देवास स्नान घालूं लागलों. परंतु पाण्यांत बेचाळीस लाख जीव आहेत. त्या जिवांमध्यें विठ्ठल आहेच. तर मी काय करूं ? त्याची पूजा कशी करूं ? जेथें जातो तेथें विठ्ठल आहेच.

तसेंच फुलें आणून मी त्याच्या माळा गुंफिल्या आणि देवाची पूजा बांधूं लागलों पण फुलांचा वास तर आधींच भ्रमरांनीं घेतलेला आहे. भ्रमरामध्येही विठ्ठल आहेच. तर मग मी काय करू ! जेथें जावें तेथें विठ्ठल आहेच.

विठ्ठलास नैवेद्य करावा म्हणून मी दूध आणलें त्याची खीर केली व देवास नैवेद्य दाखवूं लागलों.परंतु गाईच्या वासरानें यापूर्वीच दूध उष्टवले होतें. वासरामध्येंही विठ्ठल आहेच. तर मग मी काय करूं ? जिकडे तिकडे ईश्वर व्याप्त आहे.

येथें विठ्ठल आहे, तेथें विठ्ठल आहे. संसारांत असें एक स्थान नाहीं कीं ज्याठिकाणी विठ्ठलाचे अस्तित्व नाहीं. हे प्रभो ! तूं तर पृथ्वीवर सर्वत्र वास करतोस. आपल्या अस्तित्वानें तूं सर्व जग पूर्ण व्यापिलें आहेस. नामदेव, तुला प्रणाम

———

# शिरडीस जाणाऱ्या साईभक्तांस सूचना

१ शिरडीस पोहोचल्या नंतर चौकशी आफिसांत खोली बद्दल तपास करा.

२ खोलींत सामान ठेऊन कुलूप लावल्याशिवाय कोठेही बाहेर जाऊं नका.

३ सार्वजनीक हॉटेलमध्ये जागा मिळाली तर, तुमचें सामान चीजवस्त संभाळण्याची काळजी घ्या. सामानाजवळ आपला एक माणूस बसवून मगच इतरत्र जा. चोर मागावर असतात.

४ स्नानगृहांतून बाहेर येतांना पैशाचे पाकीट दागिने, हातांतील घड्याळ, कपडे, भांडी वगैरे बरोबर घेण्यास विसरूं नका. अलिकडे लॉकर्सची सोय करण्यांत आली आहेच, तिचा जरूर फायदा घ्या.

६ अंगावर दागिने असलेल्या आपल्या लहान मुलांना एकटे सोडूं नका.

७ श्रीचे आरतीचे वेळीं धक्काबुक्की होते. त्यावेळीं आपल्या मुलांना संभाळा व आपल्या खिसा पाकीटांवर लक्ष ठेवा.

७ श्रींचे ऑफिसशिवाय कोणत्याहि इतर ठिकाणीं अगर कोणाच्या हातांत पैसे देऊं नका. धर्म कृत्य फक्त संस्थेमार्फत करावें.

८ श्रींचें ऑफिसांत धर्मकृत्याबद्दल पैसे दिले, तर त्याची पावती मागून घ्या.

९ श्रीसाईबाबा संस्थानचा, इतर ठिकाणीं श्रीसाईबाबांचे नांवावर चाललेल्या संस्थांशीं कांहींहि संबंध नाहीं.

१० श्रींचा कोणी शिष्य नाहीं, अगर वारसदार गादीवर बसलेला नाहीं. अगर मध्यस्ती नाहीं. नुसत्या श्रींच्या पेहेरावासारखे पेहेराव केलेल्या, माणसावर विश्वास ठेवून फसू नका.

११ मार्गदर्शकाचें सोंग करून कांहीं अपरिचीत माणसें, शिरडीचीं स्थळें दाखविण्यासाठीं ओळख करून घेतात. अशा माणसांवर विश्वास ठेवूं नका.

१२ श्रींचे नांवावर कांहीं माणसें जंतर मंतर, धागादोरा करणारे मांत्रिक तांत्रिक म्हणून फिरत असतात. त्यांचेपासून सावध रहा.

१३ श्रींचे नांवावर चालू असलेल्या सांखळी पत्रास महत्त्व देऊं नका.

१४ श्रींचे बाबतींत आधारभूत माहिती, ऑफिसांत विचारावी, इतरांवर विश्वास ठेवूं नका.

१५ आपली कांहीं तक्रार असल्यास, मुद्दाम सोईसाठीं ठेवलेल्या नोंद पुस्तकांत, आपली तक्रार नोंदावी. आपलें पूर्ण नांव व पूर्ण पत्ता नोंदविण्यास विसरूं नका. शक्य झाल्यास तक्रारींची एक प्रत मुंबई कचेरीकडे पाठवावी.




## नोव्हेंबर १९६०

**या** महिन्यांत श्रींचे दर्शनास बाहेर गांवच्या भक्तांची बरीच गर्दी झाली होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली. ती खालीलप्रमाणें :—

**किर्तनें**—श्री. ह. भ. प. गणेश शंकर गोखले, पेण, जि. कुलाबा (मुंबई) श्री. ह. भ. प. शंकर व्यंकटेश रुपलग, श्रीक्षेत्र पंढरपूर, सं. गवई मराठे यांची कीर्तनें दोन एकादशी प्रित्यर्थ व एक श्रीज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथी निमित्त अशी तीन कीर्तनें झालीं.

**प्रवचनें**—श्री. दा. शं. टिपणीस, मु. ठाणें.

**गायन**—श्री. जयवंत कुळकर्णी, विलेपारले; श्री. स. वा. भट, डॉक्टर पुणें; श्री. विठ्ठल हरिभाऊ उले, अमरावती; कुमारी सुशिला केळकर, ठाकुरद्वार, मुंबई; श्री. गणपतराव देवासकर, मुंबई; श्री. कृष्णाजी पुरुषोत्तम जोशी, ठाणें; श्री. शशिकांत गंगाधर सोहनी, दादर, मुंबई.

**तबला, पखवाज वादन**—श्री. महंमद लतीफ मुंबई श्री. रघुनाथ सोनबा वाघमारे श्रीक्षेत्र पंढरपूर, श्री. शरद वासुदेव खांडेकर विलेपारलें, मुंबई.

**भजनी मंडळें**—श्री सिद्धेश्वर प्रासादिक भजनी मंडळ सोलापूर, प्रो. शंकर गंगाधर सोनवणे. सोलापूर, श्री. तरुण कचरनाथ भजनी मंडळ मुंबई, श्री. अंबाप्रसाद सुरतवाला, हैद्राबाद भजन मंडळ.

**कव्वाली गायन**—मे. आसलम् अझाद कव्वाल मुंबई, म. मेराजुद्दीन मुंबई, मे. सय्यद इस्माईल, मुंबई.

श्रीमत् जगद्‌गुरू शंकराचार्य संकेश्वरमठ शिष्यस्वामीनीं (जेरेशास्त्री वाडीकर) श्रीमंदिरास भेट दिली. सर्व भक्तांना दर्शनाचा लाभ मिळाला. संस्थानतर्फे आचार्यांची पाद्यपूजा सत्कार मे. रिसीव्हर साहेब यांचेहस्तें करण्यांत आला.

**सर्वधर्म परिषद्**— शिरडी येथें ता. २, ३ व ४ डिसेंबर १९६० रोजीं पार्लमेंट ऑफ् रिलिजन्सची बैठक श्री. एस्. एस्. ए. रामय्या यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्यासाठीं शिरडी संस्थानतर्फे जरूर त्या सोयी उपलब्ध करून देण्यांत आल्या होत्या. एक धार्मिक कार्य या दृष्टीनें शक्य तो सहकार देण्यांत आला.

श्री. रामय्या यांचा योगासनांचा व्यासंग दांडगा आहे. तो त्यांचा आवडता विषय आहे. या बैठकीच्या प्रसंगीं त्यांनीं नानाप्रकारचीं योगासनें घालून दाखविलीं व मधुमेह, अर्धांग वगैरे दुर्धर रोग हटविण्याच्या बाबतींत योगासनांचा कसा उपयोग होऊं शकतो हें सर्वांना पटवून दिलें. साकोरी येथील कन्यका, तसेंच डॉ. केसकर, श्री. वाघ वगैरे मंडळी या बैठकीनिमित्त मुद्दाम आली होती.

या बैठकीचे स्वागताध्यक्ष या नात्यानें शिरडी संस्थानचे रिसीव्हर श्री. गो. वि. क्षीरसागर यांचें विचारपरिप्लुत असें भाषण झालें. आपल्या भाषणांत त्यांनीं वैदिकधर्माचें महत्त्व व श्रेष्ठत्व कथन करून सांगितलें कीं, " वैदिकधर्माचें आचरण कठीण आहे. तें सर्वांकडून घडेलच असें नाहीं. परन्तु मोक्षाचा मार्ग सर्वांना सुलभतेनें चोखाळतां यावा म्हणून व्यास महर्षींनीं सुलभ असा भागवतधर्म, भक्तिमार्ग सांगितला आहे. भक्तिमार्गानें जाऊन प्रत्येकाला आपलें मोक्षाचें ध्येय प्राप्त करून घेतां येतें. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकारामादि साधुसन्तांनींही भक्तिमार्गाला महत्त्व दिलें आहे व त्याची थोरवी परोपरीनें गायिली आहे. श्रीसाईबाबांनींही आपल्या पुढें तोच सुलभ मार्ग ठेविला आहे. डॉ. केसकर यांचेंही याप्रसंगीं मार्गदर्शक असें भाषण झालें.

शिरडी येथील हवापाणी सध्या उत्तम आहे.



**जैसें डोळ्यां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे ॥**
**मग वास पाहिजे तेथें प्रगट । महानिधी ॥** ज्ञानेश्वर.

हीं कदाचित् कविकल्पना असेल—पण डोळे काळजीपूर्वक तपासून अचूक चष्मा बनवून घेतल्यास, शतायुषी झालांत तर दृष्टि स्वच्छ रहाते हें सत्य आहे.

याकरितां **निर्दोष चष्मे** बनविणार

# शेंडे आणि कंपनी

**बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४.** यांचा सल्ला घेऊन निरधास्त रहा.

बाहेरगांवीं फ्रेम्स, लेन्सीस् व प्रिस्क्रिप्शनप्रमाणें चष्मे बनवून ऑर्डरप्रमाणें पाठवूं.






तारेचा पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनीयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं चालविलेलें एकमेव ठिकाण.

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

**गरीब साईभक्तांसाठीं खास सवलत**

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा :—

**सुपरिंटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रमतापूर, हैद्राबाद १३. [ आंध्र प्रदेश ]**




